रायगड, नवी मुंबई
◆ वर्ष १८ ◆ अंक ६९
www.ramprahar.com
# राम प्रहर
शुक्रवार, २६ सप्टेंबर २०२५ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २

## अंतरंग
कर्जतच्या लोभेवाडीमध्ये पुन्हा काळ्या जादूचा प्रकार/२
खोपोलीत जुगार खेळणारे १७ जण ताब्यात/५
अलिबाग येथे राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धा/८

## अतिवृष्टीग्रस्तांना सरकारकडून तातडीने मदत देण्यास सुरुवात



**मुंबई** : राज्यात यंदा मुसळधार पावसाने थैमान घातले असून जूनपासून आजपर्यंत पावसाच्या विविध कारणाने ८४ जणांचा बळी गेला आहे. अनेकांची घरे वाहून गेली. हजारो घरांची पडझड झाली. राज्यभर नुकसान पाहणी दौरे सुरू असून पंचनामे सुरू आहेत. दरम्यान, अतिवृष्टी आणि महापुरात मृत्यू झालेल्या मृतांच्या कुटुंबियांना चार लाखांची आर्थिक मदत मिळण्यास सुरुवात झाली आहे. केवळ आठ दिवसांच्या आत आपत्ती व्यवस्थापन विभागाकडून ही मदत संबंधित कुटुंबांच्या खात्यावर जमा झाली आहे. शासनाच्या निकषांनुसार पुरामुळे झालेल्या नुकसानीसाठी विविध प्रकारच्या मदतीची तरतूद करण्यात आली आहे. जिल्हाधिकाऱ्यांना याबाबत थेट अधिकार देण्यात आले आहेत. जिल्हाधिकाऱ्यांकडे निधी शिल्लक नसेल तरी उणे बजेटमधून तरतूद करण्याचे आदेश शासनाकडून देण्यात आले आहेत.

# दिवाळी अंक मराठी साहित्याचा अविभाज्य भाग -डॉ. सदानंद मोरे

पनवेल : हरेश साठे

**दिवाळी अंक मराठी साहित्याचा अविभाज्य भाग आहे. दिवाळी ही केवळ फराळ, फटाक्यांपुरती मर्यादित नाही, तर दिवाळी अंकांच्या माध्यमातून ज्ञान, विचार, साहित्य व संस्कृतीचे जतन, संवर्धन करण्याची परंपरा आहे. दिवाळी अंकाच्या अनुषंगाने हा सण ज्ञानाचासुद्धा आहे, असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे अध्यक्ष डॉ. सदानंद मोरे यांनी येथे केले.**

(अधिक छायाचित्रे पान ८ वर..)




विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय कामगिरी बजावणारे श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित २४व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा गुरुवारी (दि.२५) पनवेल शहरातील आद्य क्रांतिवीर वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहात माजी खासदार लोकनेते ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली झाला. या वेळी दिवाळी अंक प्रदर्शनाचे उद्घाटनही सदानंद मोरे यांच्या हस्ते झाले. त्या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून ते बोलत होते.

व्यासपीठावर प्रमुख मान्यवर म्हणून मुख्य आयोजक आमदार प्रशांत ठाकूर, माजी नगराध्यक्ष जे.एम. म्हात्रे, ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे, अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे अध्यक्ष एस.एम. देशमुख, मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाचे उपाध्यक्ष अरुणशेठ भगत, सचिव परेश ठाकूर, मुंबई मराठी पत्रकार संघ विश्वस्त राही भिडे, देवदास मटाले, कार्यवाह शैलेंद्र शिर्के, भाजपचे जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, स्पर्धा समन्वयक दीपक म्हात्रे, माजी शहराध्यक्ष अनिल भगत, जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील, खारघर मंडळ अध्यक्ष प्रवीण पाटील, पनवेल शहराध्यक्ष सुमित झुंझारराव आदी उपस्थित होते. कार्यक्रमाला स्थानिक स्वराज्य संस्थांचे लोकप्रतिनिधी, लेखक, साहित्यिक, साहित्यरसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. (पान २ वर..)

### सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्याकडून शुभेच्छा

*या सोहळ्याला राज्याचे सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांची प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थिती लाभणार होती, मात्र शासकीय कामामुळे त्यांना उपस्थित राहता आले नाही, परंतु मंत्री आशिष शेलार यांनी या कार्यक्रमाला उपस्थित राहू शकत नसल्याची खंत व्यक्त करत दिलगिरी व्यक्त केली. या सोहळ्याला येण्याची इच्छा असतानाही अचानक शासकीय कार्यक्रमामुळे येत नसल्याचे त्यांनी कळविले तसेच तशी विशेष चित्रफीत पाठवून संस्थेमार्फत क्रीडा, संस्कृती व कलाक्षेत्रास वाव देण्याकरिता समाजातील विविध घटकांसाठी आपली संस्था सतत प्रयत्नशील असल्याचे नमूद करत सोहळ्याला शुभेच्छा व्यक्त करून या स्पर्धेचे कौतुक केले.*

**लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या मार्गदर्शनाखाली श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ सन १९९५पासून विविध क्षेत्रांत उपक्रम राबवत आहे. यापैकीच लोकांच्या मनाचा ठाव घेणारी आणि लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या हृदयाच्या जवळची दिवाळी अंक स्पर्धा विशेष ठरली आहे. रायगड जिल्ह्यापासून सुरुवात झालेल्या या स्पर्धेने आज राज्यस्तरीय व्यासपीठ गाठले आहे. मुंबई मराठी पत्रकार संघाचे सहकार्य आणि साहित्यप्रेमींचा उत्स्फूर्त सहभाग यामुळे स्पर्धेचे रूप भव्य झाले. आज ही केवळ स्पर्धा नाही, तर सर्जनशीलतेचा उत्सव ठरली आहे. या प्रवासात साथ देणाऱ्या सर्वांचे मनःपूर्वक आभार!**
**-आमदार प्रशांत ठाकूर, अध्यक्ष, श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ**

# माथाडी कामगारांचे प्रश्न मार्गी लागणार -मुख्यमंत्री

**नवी मुंबई : बातमीदार**



आगामी १५ दिवसांत सिडकोच्या घरांच्या किमती कमी करण्याबाबत आणि माथाडी कामगारांच्या विविध प्रश्नांवर बैठक घेण्यात येईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी गुरुवारी (दि. २५) दिले. ते नवी मुंबईतील माथाडी मेळाव्यात बोलत होते.

कै. अण्णासाहेब पाटील यांच्या ९२व्या जयंतीनिमित्त वाशी येथे आयोजित मेळाव्यास मुख्यमंत्र्यांसह वनमंत्री गणेश नाईक, पणनमंत्री जयकुमार रावल, सार्वजनिक बांधकाममंत्री शिवेंद्रराजे भोसले, आमदार सर्वश्री मंदा म्हात्रे, निरंजन डावखरे, प्रशांत ठाकूर, महेश बालदी, विक्रांत पाटील, कुमार आयलानी, मनोज जामसुतकर, माजी खासदार संजीव नाईक, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाचे अध्यक्ष नरेंद्र पाटील, कार्याध्यक्ष आमदार शशिकांत शिंदे आणि अन्य मान्यवर उपस्थित होते.

अण्णासाहेब या महापुरुषाने माथाडी चळवळ निस्वार्थीपणे उभारली व लाखो माथाडी कामगारांचे भविष्य उज्वल केले. त्यांचा वारसा त्याच निस्वार्थ भावनेने नरेंद्र पाटील चालवत आहेत, असे गौरवोद्गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले. माथाडी कामगारांच्या वडाळा येथील घरांचा प्रश्न, साताऱ्यातील टाटा प्रकल्पातील प्रश्न आणि पुणे-नाशिक येथील कामगारांच्या समस्या मार्गी लावण्याचे आश्वासन त्यांनी या वेळी दिले.

आपल्या भाषणात मुख्यमंत्री फडणवीस यांनी महायुती सरकारने मराठा समाजाचे आरक्षण टिकवून ठेवण्यासाठी केलेल्या प्रयत्नांवर भर दिला. सारथी संस्थेच्या माध्यमातून १२०हून अधिक आयएएस आणि आयपीएस अधिकारी तसेच १०४८ एमपीएससी अधिकारी तयार झाल्याचे त्यांनी सांगितले. हे सर्व अधिकारी आज महाराष्ट्रात नोकरी करत असून सरकार प्रत्येक समाजाच्या पाठीशी ठामपणे उभे असल्याचे त्यांनी नमूद केले.

कै. अण्णासाहेब पाटील यांच्या जयंती कार्यक्रमाला सर्वाधिक वेळा उपस्थित राहण्याचा विक्रम आपलाच आहे, असेही मुख्यमंत्री फडणवीस यांनी सांगितले तसेच, अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाने दीड लाख उद्योजक तयार केले असून त्यांना १३ हजार कोटी रुपयांचे कर्ज उपलब्ध करून दिले आहे. पुढील काळातही हे महामंडळ सरकारच्या पाठिंब्याने काम करत राहील, अशी ग्वाही त्यांनी दिली.

मुख्यमंत्र्यांचे भाषण सुरू असताना, काही माथाडी कामगारांनी हातात फलक घेऊन आपले प्रश्न मांडण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी भाषण थांबवत, ही आपलीच माणसं आहेत असे म्हणत मुख्यमंत्री फडणवीस यांनी त्यांच्या प्रश्नांकडे लक्ष दिले. सिडकोच्या घरांच्या किमती कमी करण्याबाबत १५ दिवसांत बैठक घेऊन दिवाळीची भेट देण्याचे आश्वासन त्यांनी दिले. या वेळी नरेंद्र पाटील, शशिकांत शिंदे यांचीही भाषणे झाली.

## निवडक

### निवडणूक आयोगाकडून टपाल मतपत्रिकांच्या मोजणीत बदल

**नवी दिल्ली** : निवडणुकांमध्ये अधिक सुसूत्रता आणि पारदर्शकता आणण्यासाठी आयोगाने टपाल मतपत्रिकांच्या मतमोजणी प्रक्रियेत बदल केला आहे. आता टपाल मतपत्रिकांची मोजणी पूर्ण झाल्याशिवाय ईव्हीएम मतमोजणीचा शेवटचा टप्पा सुरू केला जाणार नाही. या नव्या नियमाचा पहिला प्रयोग बिहार विधानसभा निवडणुकीमध्ये केला जाईल. यामुळे मतदार आणि उमेदवारांमध्ये संभ्रम राहणार नाही, असे निवडणूक आयोगाने म्हटले आहे.

### अग्नी-प्राईम क्षेपणास्त्राची रेल्वेवरून यशस्वी चाचणी

**नवी दिल्ली** : भारताने गुरुवारी (दि. २५) एक ऐतिहासिक कामगिरी करत अंतरमध्य पल्ल्याच्या अग्नी-प्राईम क्षेपणास्त्राची यशस्वी चाचणी घेतली. विशेष बाब म्हणजे हे क्षेपणास्त्र प्रथमच रेल्वेवर आधारित मोबाईल लॉन्चर सिस्टमवरून प्रक्षेपित करण्यात आले. याची कमाल मारक क्षमता २००० किमी आहे. या चाचणीनंतर भारताने जगातील अत्याधुनिक लष्करी तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या मोजक्या प्रगत राष्ट्रांच्या यादीत आपले स्थान मजबूत केले आहे.

## चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांना अभिवादन



**उरण : रामप्रहर वृत्त**

देशाच्या स्वातंत्र्यलढ्यात महत्त्वपूर्ण ठरलेल्या चिरनेर जंगल सत्याग्रहाचा ९५वा वर्धापन दिन गुरुवारी (दि.२५) होता. या निमित्ताने पनवेल मतदारसंघाचे आमदार प्रशांत ठाकूर आणि उरण मतदारसंघाचे आमदार महेश बालदी यांनी चिरनेर येथे जाऊन सत्याग्रहातील हुतात्म्यांना अभिवादन केले.

या वेळी भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, राज्य परिषद सदस्य रवी भोईर, उरण ग्रामीण मंडळ अध्यक्ष धनेश गावंड, सहखजिनदार सुशांत पाटील, ज्येष्ठ नेते राजा खारपाटील, पूर्व विभाग अध्यक्ष शशिकांत पाटील, सरपंच भास्कर मोकल, सदस्य समीर डुंगीकर, गाव अध्यक्ष जयेश खारपाटील, प्रतिक गोंधळी, रमेश फोफेरकर, देवेंद्र पाटील, निलेश गावंड, करण ठाकूर, मयूर म्हात्रे, सुशिल पाटील, कुंदन परदेशी, मनोज खारपाटील उपस्थित होते.

तत्पूर्वी झालेल्या कार्यक्रमात खासदार श्रीरंग बारणे व इतर सर्वपक्षीय नेतेमंडळींनी हुतात्म्यांना अभिवादन केले, तर पोलीस दलाकडून शासकीय इतमामात मानवंदना देण्यात आली.

## ऑनलाईन जुगार; आरोपीला अटक

**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलिसांच्या सायबर सेल विभागाने ऑनलाईन जुगाराचा उलगडा गेला आहे. एएम ९९९ गेमिंग ॲपशी निगडीत एका आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. भारमल हनुमान मिना असे त्याचे नाव असून त्याला सवाई माधवपूर (राजस्थान) येथून ताब्यात घेण्यात आले. अन्य पाच आरोपींचा शोध सुरू आहे.

या प्रकरणात कोट्यवधींचे व्यवहार झाल्याचे तपासात समोर आले आहे. यात काही बँक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचाही सहभाग असण्याची शक्यता आहे, अशी माहिती रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी गुरुवारी (दि. २५) पत्रकार परिषदेत दिली. सायबर सेलच्या पोलीस निरीक्षक रिझवाना नदाफ समवेत उपस्थित होत्या. (सविस्तर वृत्त पान २ वर..)

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा जीवनगौरव पुरस्काराने होणार सन्मान

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांना पनवेल टाइम्सच्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित पुरस्कार सोहळ्यात जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित केले जाणार आहे.

या सोहळ्यास कोकण मराठी साहित्य परिषदेचे संस्थापक अध्यक्ष पद्मश्री मधु मंगेश कर्णिक, राज्याच्या मंत्री आदिती तटकरे, ज्येष्ठ संपादक मधुकर भावे, दैनिक लोकमतचे संपादक संजय आवटे, पनवेल महापालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रितम म्हात्रे, सुप्रसिद्ध अभिनेत्री ऋतुजा बागवे आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत.

गणेश कोळी संपादित सा. पनवेल टाइम्सचा वर्धापन दिन सोहळा शनिवारी (दि. २७) पनवेल येथील श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळाच्या सभागृहात सायंकाळी ४.३० वाजता होणार आहे. या वेळी पनवेलचे नाव उंचवणाऱ्या व्यक्ती आणि संस्थांना पनवेल टाइम्स सन्मान पुरस्काराने मान्यवरांच्या हस्ते सन्मानित केले जाणार आहे, तर वर्धापन दिनानिमित्ताने 'विकासाचं आंतरराष्ट्रीय शहर-पनवेल..' या विषयावरील निबंध स्पर्धेतील विजेत्यांना रोख पारितोषिके दिली जाणार आहेत.

## पनवेलमध्ये स्वच्छता महाश्रमदान मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**



पनवेल महापालिकेमार्फत एक दिन एक तास एक साथ मोहिमेंतर्गत स्वच्छता महाश्रमदान मोहिमेचे भव्य आयोजन पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या प्रमुख उपस्थितीत गुरुवारी (दि. २५) करण्यात आले होते. केंद्र शासनाच्या स्वच्छोत्सव-स्वच्छता ही सेवा २०२५ अभियान अनुषंगाने ही मोहीम आयुक्त तथा प्रशासक मंगेश चितळे यांच्या मार्गदर्शनाखाली घेण्यात आली.

या उपक्रमांतर्गत पनवेल महापालिकेच्या चारही प्रभागामध्ये विविध २२ ठिकाणी स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. या उपक्रमामध्ये सुमारे २७ हजार नागरिकांनी सक्रिय श्रमदान केले.

या विशेष मोहिमेचा मुख्य कार्यक्रम खांदेश्वर तलाव येथे घेण्यात आला. या ठिकाणी आमदार प्रशांत ठाकूर, आयुक्त मंगेश चितळे यांच्यासह भाजपचे रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, गणेश पाटील, नवीन पनवेल मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, मोतीलाल कोळी, भीमराव पोवार, उपायुक्त डॉ. वैभव विधाते, अधिकारी व कर्मचारी, स्वयंसेवी संस्था, महाविद्यालये, शाळा इत्यादींनी सक्रिय सहभाग नोंदवला. या उपक्रमांतर्गत सुमारे ६४ टन कचऱ्याचे संकलन करण्यात आले. या वेळी सर्वांना स्वच्छतेची शपथ देण्यात आली. त्याचप्रमाणे स्वच्छता ही सेवा या अंतर्गत स्वच्छोत्सव २०२५मध्ये नागरिकांनी याच पद्धतीने मोठ्या संख्येने सहभाग नोंदवावा, असे आवाहन करण्यात आले.

## लालबागचा राजा मंडळाकडून पूरग्रस्तांना मदत

**मुंबई : प्रतिनिधी**

लालबागचा राजा सार्वजनिक गणेशोत्सव मंडळाकडून अतिवृष्टीमुळे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांसाठी तब्बल ५० लाख रुपये मदत जाहीर करण्यात आली आहे. मदतीचा धनादेश मंडळाच्या पदाधिकाऱ्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केला.

राज्यात गेल्या काही दिवसांपासून पडलेल्या मुसळधार पावसाने मराठवाड्यातील शेतकऱ्यांचे नुकसान झाले आहे. शेतातील पिकांसह माती आणि जनावरेही वाहून गेली आहेत. बळीराजावरील या संकटात आधार देण्यासाठी सरकारसह अनेक हात पुढे सरसावल्याचे चित्र दिसून येत आहे.

# जेएनपीएच्या इलेक्ट्रिक ट्रकच्या ताफ्याचे केंद्रीय मंत्री सोनोवाल यांच्या हस्ते लोकार्पण

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



देशातील महाकाय कंटेनर बंदर असलेल्या जेएनपीएने गुरुवारी (दि. २५) न्हावाशेवा डिस्ट्रीब्यूशन टर्मिनल येथे इलेक्ट्रिक वाहन (ईव्ही) ट्रकच्या नवीन ताफ्याचे लोकार्पण केले. या कार्यक्रमाला केंद्रीय बंदरे, जहाजबांधणी आणि जलमार्ग मंत्री सर्बानंद सोनोवाल प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

आधुनिक ईव्ही ट्रकचा समावेश हा जेएनपीएच्या सागरी व लॉजिस्टिक परिसंस्थेतील कार्बन कमी करणे आणि ऊर्जा संक्रमणाच्या ध्येयाकडे आणखी एक निर्णायक पाऊल आहे. या कार्यक्रमास एमओपीएसडब्ल्यूचे संयुक्त सचिव आर. लक्ष्मणन, उरणचे आमदार महेश बालदी, जेएनपीएचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक उन्मेष वाघ, जेएम बक्षी ग्रुपचे ध्रुव कोटक हेही उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान जेएनपीए आणि दिल्ली येथील अशोका विद्यापीठाच्या आयझॅक सेंटर फॉर पब्लिक पॉलिसी यांच्यात सामंजस्य करार करण्यात आला. या वेळी मंत्रालयाच्या दृष्टिकोनावर प्रकाश टाकताना केंद्रीय मंत्री, सर्बानंद सोनोवाल म्हणाले की, आज जेव्हा जेएनपीए आपली लॉजिस्टिक वाहने इलेक्ट्रिक करण्याचा निर्णायक टप्पा गाठते, तेव्हा हा संदेश फक्त बंदरापुरताच मर्यादित राहत नाही, तर भारतातील बंदरे भविष्यातील बदलाच्या स्वागतासाठी सज्ज असल्याचा आहे. अलीकडच्या काही महिन्यांत जेएनपीए योग्य कारणांसाठी सातत्याने चर्चेत आहे. मग ते जागतिक बँकेच्या सीपीपीआय निर्देशांकात जागतिक स्तरावरील प्रमुख २५ बंदरांमध्ये स्थान मिळवणे असो, कंटेनर हाताळणीमध्ये विक्रम साध्य करणे असो किंवा सेझमधील महत्त्वाचे प्रकल्प पुढे नेणे असो. बंदर कारभारात ईव्ही ट्रकचा समावेश करून जेएनपीए पुढील बाबींमध्ये योगदान देणार आहे.

# ऑनलाईन जुगाराचा उलगडा; रायगड पोलिसांनी एकाला राजस्थानमधून केली अटक

## बँक अधिकारी सामिल असण्याची शक्यता



**अलिबाग : प्रतिनिधी**

रायगड पोलिसांच्या सायबर सेल विभागाने ऑनलाईन जुगाराचा उलगडा गेला आहे. एएम ९९९ गेमिंग अँपशी निगडीत एका आरोपीला अटक करण्यात पोलिसांना यश आले आहे. भारमल हुनुमान मिना असे त्याचे नाव असून, त्याला सवाई माधवपूर राजस्थान येथून ताब्यात घेतले आहे. अन्य पाच आरोपींचा शोध सुरू आहे. या प्रकरणात कोट्यवधींचे व्यवहार झाल्याचे तपासात समोर आले आहे. यात काही बँक अधिकारी आणि कर्मचाऱ्यांचाही सहभाग असण्याची शक्यता आहे, अशी माहिती रायगड पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी गुरुवारी (दि. २५) पत्रकार परिषदेत दिली. सायबर सेलच्या पोलीस निरीक्षक रिझवाना नदाफ या वेळी उपस्थित होत्या.

अलिबागमधील नागडोंगरी येथे राहणाऱ्या अमित बापू जाधव यांना मोबाईलवर तीन चार महिन्यांपूर्वी ऑनलाईन गेमिंगच्या अनेक जाहिराती येत होत्या, गुगल प्ले स्टोअरवर हे अँप उपलब्ध असल्याने त्यांनी यातील तीन अँप डाऊनलोड केले. यात एएम ९९९, परिमिच आणि मधूर मटका या तीन अँप्सचा समावेश होता. तिन्ही अँपसाठी रजिस्ट्रेशन केल्यानंतर त्यांनी गुगल पेच्या माध्यमातून ऑनलाईन गेमिंग खेळण्यासाठी त्यांनी एएम ९९९ अँपच्या माध्यमातून वॉलेटमध्ये गुगल पेच्या माध्यमातून दहा हजार रुपये जमा केले, मात्र यातुन त्यांना कुठलाही परतावा आला नाही. आपती फसवणूक झाल्याचे लक्षात येताच त्यांनी अलिबाग येथील सायबर पोलीस ठाण्यात याबाबतची तक्रार नोंदवली. या प्रकरणी गुन्हा दाखल केला.

या प्रकरणाची गंभीर दखल घेऊन पोलीस निरीक्षक रिझवाना नदाफ, आणि सहाय्यक पोलीस निरीक्षक अमोल जाधव यांनी या प्रकरणाचा सखोल तपास सुरू केला. तांत्रिक माहिती संकलित करून, तिन्ही अँपशी निगडीत असलेली ४४ बँक खाती आणि त्यामधील १९ कोटी ४४ लाख तीन हजार ४९३ रुपयांची रक्कम संबधित बँकाना सांगून गोठवली. एएम ९९९ गेमिंग अँपशी निगडीत भारमल हुनुमान मिना याला अटक केली. अन्य पाच आरोपींचा शोध सुरू आहे.

सामान्य कुटूंबातील व्यक्तींच्या नावाने करंट अकाऊंट उघडून त्यामाध्यमातून साडेतीनशे कोटींहून अधिकचे व्यवहार होत असल्याची माहिती या प्रकरणाच्या तपासात समोर आली आहे. बँकांकडून करंट अकाऊंट उघडतांना संबधित व्यक्तीची आणि त्याच्या व्यवसायाची तपासणी करणे आवश्यक असते, मात्र बँकांकडून अशी कुठलिही तपासणी झाल्याचे दिसून आलेले नाही. विशेष म्हणजे या खात्यामधून गेल्या काही महिन्यात साडे तीनशे कोटींहून अधिकचे व्यवहार झाले असतांना बँकांनी त्याबाबत कुठलीच पडताळणी केलेली नाही. या प्रकरणात बँक अधिकारी आणि कर्मचारी यांचाही संशय पोलिसांनी व्यक्त केला आहे.

या प्रकरणात अटक करण्यात आलेल्या भारमल मिना आणि त्यांच्या घरातील इतर सदस्यांना या प्रकरणात दररोज एक लाख रुपयांचे कमिशन स्वरुपात मिळत होते. इतर फरार आरोपींच्या खात्यांमधून करोडो रुपयांची उलाढाल झाली आहे. त्यामुळे या प्रकरणातील तपासात ईडीचीही मदत घेणार आहे, असे रायगड पोलीस अधीक्षक आँचल दलाल यांनी सांगितले.

# कुंडलिका नदीपात्रात रसायन सोडून वाहनचालकाचे पलायन

**धाटाव : प्रतिनिधी**

रोहा-कोलाड रस्त्यालगत भरदिवसा एका अज्ञात टँकर चालकाने आरोग्यास घातक असलेले रसायन नजिकच्या कुंडलिका नदीपात्रात सोडून पलायन केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. या घटनेमुळे परिसरात चांगलीच खळबळ उडाली असून कोलाड पोलिसांनी टँकर चालकाच्या शोध मोहीम हाती घेतली आहे.

बुधवार, दुपारी सुमारे २ वाजता ही घटना अशोकनगर व पालेखुर्द गाव हद्दीत घडली. काळ्या रंगाचे हे रसायन टँकर रिकामे करताना रस्त्यावर सांडल्याने वाहनचालक व पादचाऱ्यांना डोळे चुरचुरण्याचा त्रास जाणवला. या वेळी एका महिलेला या रसायनाचा फटका बसला असून तिला तत्काळ रोह्यातील खाजगी दवाखान्यात उपचारासाठी दाखल करण्यात आले आहे.



दरम्यान, सह्याद्री वन्यजीव प्राणी संरक्षण संस्था सदस्य प्रणय शिंदे व शरद दिसले यांनी ही घटना प्रत्यक्ष पाहताच टँकरचा पाठलाग करण्याचा प्रयत्न केला. मात्र चालकाने टँकरसह पलायन केले. दोघांनीही घटनेची माहिती त्वरित कोलाड पोलिसांना दिली. धाटाव औद्योगिक वसाहतीत गुजरात, पुणे, चिपळूण आदी ठिकाणांहून रसायन घेऊन येणारे टँकर असे रसायन थेट कुंडलिका नदीपात्रातच रिकामे करतात, असा गंभीर प्रश्न स्थानिक नागरिकांनी उपस्थित केला आहे. प्रदूषण नियंत्रण मंडळ याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करत असल्याचीही चर्चा सुरु आहे.

रोहा इंडस्ट्रियल असोसिएशनचे कार्यकारी व्यवस्थापक दयानंद नांदगावकर यांनी सांगितले की, टँकर चालकाने नदी पात्रात रसायन सोडून ते रस्त्यावरही सांडलेले दिसले. या प्रकाराबाबत पोलिस व प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या वरिष्ठांना कळविले आहे. चालक व मालक यांच्यावर कारवाई होणे आवश्यक आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी औटी यांनी स्पष्ट केले की, संबंधित टँकर कोठून आलेला आहे आणि काय रसायन आणले होते, याचा तपास सुरू आहे. पोलिसांनी अज्ञात व्यक्तीविरोधात गुन्हा दाखल केला आहे. सीसीटीव्ही फुटेज तपासले जाणार आहेत. आम्ही टँकरमधील सॅम्पल घेतले असून लॅबमध्ये तपासून दोषींवर कारवाई केली जाईल.

घटनेनंतर नागरिकांमध्ये भीतीचे व असंतोषाचे वातावरण निर्माण झाले असून प्रदूषण नियंत्रण मंडळाकडून नेमकी काय कारवाई होते व पोलीस अशा पद्धतीने शोध घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# लोभेवाडीमध्ये पुन्हा काळ्या जादूचा प्रकार

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जत तालुक्यातील आदिवासी भागात असलेल्या लोभेवाडी गावात पुन्हा करणी करण्याचा प्रकार घडला आहे. गावाच्या प्रवेशद्वारावर रात्रीच्या सुमारास अज्ञात व्यक्तींनी भाज्या, लिंबू, गुलाल लोखंडी पिळदार पट्टी आणि विविध वस्तू टाकून काहीतरी काळी जादू किंवा करणी केल्याची शंका व्यक्त होत आहे.



या प्रकारामुळे ग्रामस्थांमध्ये भीतीचे वातावरण पसरले आहे. हा प्रकार सकाळी ग्रामस्थांच्या नजरेस आला. त्यामुळे भीतीचे वातावरण व गोंधळ निर्माण झाला. काहींच्या मते गुप्तधनासाठी काळी जादू करणी आली असावी असे वाटते तर काही जण हा प्रकार म्हणजे करणी किंवा वशिकरणाचे षडयंत्र असल्याचा अंदाज व्यक्त केला. गावातील वयोवृद्धांनी काही वर्षांपूर्वी स्मशानभूमीत दफन केलेला मृतदेह बाहेर काढून पूजा केल्याची घटनाही घडली होती. त्यावेळी सुद्धा गावात भीतीचे वातावरण पसरले होते.

अंधश्रद्धा निर्मूलन पथकाने लोभेवाडीस भेट देऊन ग्रामस्थांना मार्गदर्शन करून धीर देण्याचा प्रयत्न केला. जळगाव जिल्हा कार्याध्यक्ष प्रल्हाद बोऱ्हाडे, सदस्य आकाश कांबळे, अभिजीत बोऱ्हाडे यांनी य अंधश्रद्धेच्या प्रकारावर जनजागृती करण्याची आवश्यकता असल्याचे सांगितले. पोलीस प्रशासनाने या घटनेकडे गांभीर्याने लक्ष देऊन कारवाई करावी. अशी ग्रामस्थांकडून मागणी होत आहे.

# सिडकोतर्फे प्रकल्पबाधितांना भूखंडांचे वाटप

**नवी मुंबई : रामप्रहर वृत्त**

सिडको संचालक मंडळाच्या गुरुवारी (दि.२५) झालेल्या बैठकीमध्ये उरण तालुक्यातील नवी मुंबई प्रकल्पबाधितांना १२.५% योजनेंतर्गत, संगणकीय सोडतीद्वारे ७९,२१० चौ.मी. क्षेत्राच्या एकूण ९८ भूखंडांचे वाटप करण्यात आले. या वेळी अपर मुख्य सचिव असिम कुमार गुप्ता, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक विजय सिंघल यांसह इतर संचालक आणि सिडकोतील अधिकारी उपस्थित होते.



उरण तालुक्यातील भूखंडधारकांना वेळोवेळी १२.५% योजनेतील भूखंडांचे वाटप करण्यात आले होते. परंतु, कांदळवन, सीआरझेड, पाणथळ जमिनी, असंपादित जमिनी, अतिक्रमण इ. तांत्रिक कारणांमुळे उर्वरित भूखंडधारकांचे वाटप बाकी होते. गुरुवारी झालेल्या सिडको संचालक मंडळाच्या बैठकीत ७९,२१० चौ.मी. क्षेत्राच्या एकूण ९८ भूखंडांचे वाटप करण्यात आले. २०११ सालापासून प्रलंबित असलेला प्रश्न मार्गी लावण्यास सिडको महामंडळास यश आले आहे. लवकरच या भूखंडांवर पायाभूत सुविधांची कामे सुरू करण्यात येणार असल्याचे सिडकोतर्फे कळविण्यात आले आहे.



**अलिबाग : थोर विचारवंत, एकात्म मानववादाचे प्रणेनेते पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त येथील भाजप दक्षिण जिल्हा कार्यालय येथे त्यांना अभिवादन करण्यात आले. भाजपचे ज्येष्ठ नेते व जिल्हा परिषद माजी अध्यक्ष ॲड. आस्वाद पाटील, दक्षिण रायगड महिला मोर्चा अध्यक्ष चित्रा पाटील, ज्येष्ठ नेते जगदीश पाटील, अलिबाग तालुकाप्रमुख अशोक वारगे तसेच पदाधिकारी तसेच कार्यकर्ते उपस्थित होते.**

# माथेरानच्या अश्वांची आरोग्य तपासणी सुरू

**माथेरान : प्रतिनिधी**

माथेरानमधील अश्वांना काही दिवसांपूर्वी विचित्र आजाराची लागण झाल्याचे निदर्शनात आले होते.

यामध्ये अश्वांची दृष्टी हळूहळू कमी होऊन त्यांना अंधुक दिसत होते.याबाबत जिल्हा पशुसंवर्धन विभाग ॲक्शन मोडवर आले असून त्यांनी माथेरान मधील सर्व अश्वांची आरोग्य तपासणी सुरू केली असून अश्वांची स्क्रीनिंग करून मोफत औषधोपचार केले.

माथेरान पर्यटनस्थळी घोडा हेच वाहतुकीचे प्रमुख साधन आहे. काही पर्यटक तर खास घोडेस्वारी साठी या ठिकाणी दरवर्षी आवर्जून येत असतात.



याच अश्वांना काही दिवसांपूर्वी डोळ्यांच्या आजाराची लागण झाल्याचे निदर्शनास आले.दहा ते बारा घोडे आजाराने त्रस्त झाले होते. तर येथील पशुवैद्यकीय दवाखान्यात

डॉक्टर उपलब्ध नसल्याने खाजगी डॉक्टर बोलावणे अतिशय खर्चिक बाब होती.यावेळी पुण्यातील संस्थे कडून काही अश्वांची तपासणी करून रक्ताचे नमुने देखील घेतले.

ही बातमी वर्तमान पत्रात प्रसिद्ध होताच रायगड जिल्हा पशुसंवर्धन विभागाने याची दखल घेत माथेरान पर्यटनस्थळी पंचवीस अधिकारी व कर्मचारी वर्गाचे पथक तातडीने पाठविले. या पथकाने तीन टीममध्ये विभागणी करून माथेरान मधील सर्वच अश्वांची तपासणी सुरु केली. एक टीम माथेरान मुख्य प्रवेशद्वार असलेल्या दस्तुरी येथे आणि एक टीम मुख्य बाजारपेठमध्ये आणि एक टीम त्यांनी फिरती ठेवली होती.

सुरुवातीला आजाराची लागण झालेल्या अकरा अश्वांची तपासणी व औषधोपचार करून त्यांची दृष्टी ठीक होऊन त्यांना ठणठणीत बरे करण्यात आले. तसेच हा संसर्गजन्य आजार आहे का याची माहिती घेऊन सर्व काळजीपूर्वक औषधे देण्यात आली.

> **माथेरानमधील अश्वांना डोळ्यांच्या आजाराची लागण झाली होती. डॉक्टरांची टीम वेळेत माथेरानमध्ये हजर झाल्याने धोका टळला, मात्र पशुवैद्यकीय दवाखान्यात याठिकाणी डॉक्टरांची नेमणूक करणे आवश्यक आहे. शासनाने याची दखल घेऊन डॉक्टरची नेमणूक करावी अशी आमची आग्रही मागणी आहे.**
>
> **-आशा कदम,अध्यक्षा,**
> **स्थानिक अश्वपाल संघटना**

# रामशेठ ठाकूर कॉलेजमध्ये सामंजस्य करार

**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात गुरुवारी (दि.२५) कॉमर्स व अकाउंटन्सी, अकाउंट व फायनान्स तसेच एस सेक्युरिटी प्रायव्हेट लिमिटेड कंपनी या संस्थांमध्ये सामंजस्य करार करण्यात आला.

या सामाजिक करारासाठी पंकज दगा (मार्केटिंग हेड, एस सेक्युरिटी प्रायव्हेट इंडिया लिमिटेड) मुंबई व महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या



डॉ. महेश्वरी झिरपे यांनी उपस्थित राहून सामंजस्य करारावर स्वाक्षरी करून दोन्ही संस्थांमधे ज्ञान-संसाधनाची देवाण-घेवाण होईल अशी हमी देण्यात आली.

या सामंजस्य कराराच्या माध्यमातून महाविद्यालयातील कॉमर्स व अकाउंटन्सी व अकाउंट फायनान्स विभागातील विद्यार्थी व विद्यार्थिनींसाठी वेगवेगळे कोर्सेस सुरू करण्यात येतील तसेच व प्रशिक्षण देण्यात येईल. या सामंजस्य करारासाठी कॉमर्स अकाउंटन्सी विभाग प्रमुख प्रा. विशाल देशमुख, अकाउंट व फायनान्स विभाग प्रमुख प्रा. प्रवर शर्मा, तसेच दोन्हीही विभागातील इतर सर्व प्राध्यापक उपस्थित होते.

# सीकेटी विद्यालयात हिंदी दिवस साजरा

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

नवीन पनवेलमधील सीकेटी विद्यालयात गुरुवारी (दि.२५) हिंदी दिवस साजरा झाला. या वेळी जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट विद्यालयाच्या प्राध्यापिका प्रमिला संतोष पवार ह्या प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होत्या.

संगीत शिक्षक रूपेश मढवी व विद्यार्थ्यांनी गणेशवंदना सादर केली. प्रमुख अतिथींचा परिचय हिंदी शिक्षक प्रमोद शेळके यांनी केला. प्रस्तावना



शशिकला पाटील यांनी केली. अप्रतिम कार्यक्रम शशिकला पाटील आणि इतर हिंदी शिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली सादर केले. अशोक पाटील यांनी शिक्षक मनोगत व्यक्त केले. मुख्याध्यापक संतोष चव्हाण यांनी भाषणात हिंदी हिंदी विभागातील सर्व शिक्षकांचे कौतुक केले. प्रगती जाधव आणि जिया फडके व सांची पंडित या विद्यार्थ्यांनी सूत्रसंचलन केले.

# रेल्वेस्थानकावर मुलगी सापडली

**पनवेल :** रेल्वे स्थानकावर पाच वर्षांची मुलगी जोया बिंदू सादिक ही रेल्वे प्रवासी साहिल वीरन लाड यांना विनापालकाशिवाय भटकत असताना आढळली. त्यांनी तत्काळ रेल्वे पोलिसांना कळवून मुलीला त्यांच्या ताब्यात दिले आहे.



मुलीची उंची तीन फूट एक इंच असून रंग सावळा, अंग सडपातळ, केस काळे, नाक सरळ व चेहरा उभट आहे. अंगात तिने पिवळा शर्ट व पांढरी हाफ पॅन्ट घातली होती. पनवेल रेल्वे पोलिसांनी मुलीला पंचवटी, पनवेल खांदा कॉलनी येथे सुरक्षित ठेवले आहे. या मुलीच्या नातेवाईकांबद्दल काही माहिती असल्यास मपोहवा सना आयाज घाटकरी (९७०२७८६४५९) यांच्याशी संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# सोमण यांच्यामुळे अपघात टाळण्यास मदत

**पनवेल : वार्ताहर**

शिवसेना स्थानिक नेते चंद्रशेखर सोमण यांनी तत्परतेने दोन रस्त्यामधील असलेला फरक व त्यामुळे सातत्याने होणारे अपघात याबाबतची माहिती पनवेल वाहतूक शाखेला देताच तेथील वपोनि औदुंबर पाटील यांनी तातडीने सदर रस्त्यावर असलेला फरक माती टाकून सरळ केला त्यामुळे या भागात होणारे अपघात टाळण्यास मदत झाली आहे.

विद्युत वीज वितरण कंपनीचे डिव्हीजनल अकाऊंट सांडभोर व आऊटलेट कर्मचारी करण पाटील हे वसुली मोहिमेंतर्गत आपल्या दुचाकीवरुन पनवेल बाजूकडून ओरियन मॉलजवळील उड्डाण पुलावरुन नवीन पनवेल बाजूकडे जात असताना उड्डाण पुलाच्या उतरणीच्या वेळी दोन रस्त्यामध्ये फरक असल्याने त्यांचे वाहन घसरुन झालेल्या अपघातात हे दोघेजण जखमी झाले होते.

याबाबतची माहिती शिवसेना नेते चंद्रशेखर सोमण यांना समजताच त्यांनी त्वरित रस्त्याची समांतर लेव्हल करण्याची मागणी केली. या घटनेचे गांभीर्य लक्षात घेवून वपोनि औदुंबर पाटील व त्यांच्या विशेष पथकाने अवघ्या अर्धा तासात त्या ठिकाणी पोहचून इतर मदत कार्याच्या सहाय्याने त्या दोन रस्त्यामधील तफावत दूर केली.

## दुखवटा

### रोशन गायकवाड

**मोहोपाडा :** येथील सध्या दुर्गामाता कॉलनीत वास्तव्यास असलेले रोशन हरिभाऊ गायकवाड यांचे (वय ४८) निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन भाऊ, दोन मुले, एक बहिण असा परिवार आहे.



कै. रोशन गायकवाड यांचा दशक्रीया विधी २८ सप्टेंबर रोजी श्री क्षेत्र गुळसुंदे रसायनी येथे होणार आहे. तर उत्तरकार्य १ सप्टेंबर रोजी दुर्गामाता कॉलनी येथील राहत्या घरी होणार आहेत. या वेळी हभप वामन महाराज भोईर यांचे सकाळी १०:३० वाजता सुश्राव्य किर्तन होणार आहे.

पान १ वरुन

# दिवाळी अंक मराठी साहित्याचा अविभाज्य भाग -डॉ. सदानंद मोरे

सदानंद मोरे यांनी पुढे बोलताना सांगितले की, शतकी परंपरा असलेल्या या दिवाळी अंक स्पर्धेला पुरस्कृत करून दिवाळी अंक परंपरेला सन्मान देण्याचे काम श्री. रामशेठ ठाकूर समाजिक विकास मंडळ आणि मुंबई मराठी पत्रकार संघाने केले आहे. या वेळी त्यांनी साहित्य आणि वाचन याबद्दल उदाहरण देत दिवाळी अंकाचे महत्त्व अधोरेखित केले. दिवाळी अंक लेखन आणि वाचन संस्कृती वृद्धिंगत करते. त्यामुळे दिवाळी अंक मराठी साहित्याचा अविभाज्य भाग असून लोकनेते रामशेठ ठाकूर हे लेखक साहित्यिक यांच्या पाठीशी आहेत आणि महाराष्ट्राला हेवा वाटेल असे त्यांचे कार्य आहे, असेही त्यांनी अधोरेखित करून कौतुक केले.

लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी आपल्या भाषणात म्हटले की, स्पर्धेला २४ वर्षे झाली आणि त्या अनुषंगाने ही दिवाळी अंक स्पर्धा रंगत गेली. त्यामुळे अंकांच्या संख्येत वाढ झाली. दिवाळी अंक मराठी भाषेचे वैभव आहे व ते वृद्धिंगत झाले पाहिजे म्हणून त्यासाठी भरघोस रकमेची पारितोषिक देऊन प्रोत्साहन देण्याचे काम केले जात आहे. डिजिटलच्या युगात वर्तमानपत्राचे महत्त्व आजही कायम आहे. ९० टक्के पत्रकार दिवाळी अंकांची निर्मिती करत असतात. लेखन व वाचन संस्कृती वृद्धिंगत करण्यासाठी ही दिवाळी अंक स्पर्धा असल्याचे त्यांनी नमूद करत दिवाळी अंकांची गोडी कधीही कमी होणार नाही, असा विश्वास व्यक्त केला.

ज्येष्ठ पत्रकार मधुकर भावे यांनी आपल्या भाषणातून लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी सर्वसामान्य माणसासाठी केलेल्या कार्याला उजाळा दिला. लोकनेते रामशेठ ठाकूर दरवर्षी चार लाखांहून अधिक रकमेची बक्षिसे देऊन दिवाळी अंकांना प्रोत्साहन देत असल्याचे सांगून दिवाळी अंक स्पर्धेला बळ देण्याचे काम ते करत असल्याचे त्यांनी म्हटले. समाजाशी जोडलेली ही लोकं वाढदिवस स्वतःसाठी नाही, तर समाजाच्या हितासाठी समाजोपयोगी उपक्रमातून साजरे करतात. त्यांचे कार्य एवढे महान आहे की त्यांच्यावर कांदबरी निघेल. प्रकल्पग्रस्तांचे झुंझार नेते दि.बा. पाटील यांचे नाव विमानतळाला लागले पाहिजे यासाठी लाखाचा मोर्चा काढणारेदेखील रामशेठ ठाकूर आहेत, असेही नमूद करत 'देता देता इतुके द्यावे की त्याने रामशेठ ठाकूर व्हावे.' त्यामुळे प्रत्येक जिल्ह्यात एक तरी रामशेठ ठाकूर हवा आहे, असे त्यांनी सांगितले.

मुंबई मराठी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण यांनी आपल्या भाषणात स्पर्धेविषयी माहिती विशद केली. ही स्पर्धा होण्यासाठी लोकनेते रामशेठ ठाकूर, आमदार प्रशांत ठाकूर यांचे श्रेय असल्याचे नमूद करत त्यांचे आभार मानले तसेच आमदार प्रशांत ठाकूर राज्यातील सर्वात नम्र आमदार असल्याचे गौरवोद्गारही त्यांनी काढले.

स्पर्धेत एक लाख रुपये व सन्मानचिन्ह असलेला प्रथम क्रमांक अर्थात सर्वोत्कृष्ट राज्यस्तरीय दिवाळी अंकाचा पुरस्कार 'हंस' या अंकाने पटकाविला तर रायगड जिल्हास्तरीय प्रथम पारितोषिक इंद्रधनु अंकाने पटकाविले. त्यांना ४० हजार रुपये आणि सन्मानचिन्हाने सन्मानित करण्यात आले. राज्यस्तरीय स्पर्धेत द्वितीय पारितोषिक अंतरीचे प्रतिबिंब, तृतीय पारितोषिक अक्षर, तर सर्वोत्कृष्ट विशेषांक नवभारत, दृश्य कला विशेषांक; मुलांसाठी सर्वोत्कृष्ट दिवाळी अंक 'वयम', उत्तेजनार्थ छावा, उत्कृष्ट दिवाळी अंक कालनिर्णय, सर्वोत्कृष्ट कथा सत्याग्रह, मिलिंद बोकील (दीपावली), उत्कृष्ट कविता आजकाल बायकाही..., लक्ष्मी यादव, पुरुष स्पंदन (७६); लक्षवेधी परिसंवाद असहमतीचा आवाज, ऋतुरंग; लक्षवेधी मुलाखत डॉ. सुनील लवटे, शब्दशिवार, इंदूमती गोंधळे; सर्वोत्कृष्ट मुखपृष्ठ उत्तम अनुवाद, सर्वोत्कृष्ट व्यंगचित्रकार प्रभाकर वाईरकर, शब्द रूची; सर्वोत्कृष्ट डिजिटल अंक विवेक मेहेत्रे, 'उद्रेली ऑल दि बेस्ट २०२४'; विशेष लेख राजकारण की टोळीयुद्ध, आर्याबाग, विनय हर्डीकर यांनी, तर रायगड जिल्हास्तरीय स्पर्धेत द्वितीय पारितोषिक आगरी दर्पण, तृतीय पारितोषिक शब्दसंवाद, उत्तेजनार्थ लोकसेवक, साहित्य आभा, उत्कृष्ट कथा रेखा नाबर, लोकसेवक, जिथे कमी तिथे मी; उत्कृष्ट कविता हितवर्धक, कवी गणपत म्हात्रे, उत्कृष्ट व्यंगचित्रकार विवेक मेहेत्रे साहित्य आभा या अंकांनी पटकाविला. त्यांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पारितोषिके देऊन गौरविण्यात आले.

# महापुरुषांनी घालून दिलेला आदर्श आपण जोपासला पाहिजे -लोकनेते रामशेठ ठाकूर

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी घालून दिलेला आदर्श आपण जोपासला पाहिजे. साधी राहणी आणि उच्च विचारसरणी प्रत्येकाने अंगीकारण केल्यास जीवनामध्ये यशस्वी होऊ शकतो, असे प्रतिपादन रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल्स सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या जयंतीच्या कार्यक्रमावेळी केले.



'रयत'च्या महात्मा फुले कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये बुधवारी (दि.२४) पद्मभूषण डॉक्टर कर्मवीर भाऊराव पाटील यांची १३८वी जयंती उत्साहात साजरी झाली. जयंतीनिमित्त २२ सप्टेंबर पासून महाविद्यालयामध्ये कर्मवीर सप्ताहाचे आयोजन करण्यात असून यामध्ये निबंध आणि वक्तृत्व स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. जयंती कार्यक्रम रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि 'रयत'चे माजी सहसचिव डॉ. डी. डी. पाटील यांच्या उपस्थितीत झाला.

अत्यंत उत्साहात पार पडलेल्या या सोहळ्यात लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, रयत शिक्षण संस्था ही आमची मातृ संस्था आहे. विद्यार्थांनी गुणवत्ता पूर्ण शिक्षण घेतले पाहिजे. जाती-पाती पलीकडे जाऊन गुणवत्ता पूर्ण शिक्षण घेतले तर आरक्षणा विना आपण चांगली प्रगती साधू शकतो. महात्मा फुले, शाहू महाराज, महात्मा गांधी, कर्मवीर भाऊराव पाटील यांनी घालून दिलेला आदर्श आपण जोपासला पाहिजे. साधी राहणी व उच्च विचारसरणी प्रत्येकाने अंगी कारल्यास जीवनामध्ये यशस्वी होऊ शकतो, असे आवाहन केले.

प्रमुख पाहुणे डॉ. डी. डी. पाटील यांनी, स्वत:च्या अस्तित्वाची जाणीव निर्माण होण्यासाठी कौशल्यपूर्ण शिक्षणाची जोड असणे आवश्यक आहे. स्वावलंबी शिक्षण हे कर्मवीरांचे व्रत विद्यार्थ्यांनी अंगीकारणे आवश्यक आहे. महाराष्ट्राच्या जडणघडणीमध्ये कर्मवीरांचे योगदान खूप मोठे असून कर्मवीरांनी शिक्षण क्षेत्रांमध्ये अमूल्य क्रांती केली. आजच्या तरुण पिढीला कौशल्य पूर्ण विकास साधावयाचा असल्यास अमेरिका, दक्षिण कोरिया यासारख्या विकसित देशांचा आदर्श समोर ठेवावा. समतेवर आधारित समाज रचनेची परंपरा कर्मवीरांनी पुढे नेली. कर्मवीर आण्णा चौकटी बाहेरील प्रज्ञावंत होते. महाराष्ट्राच्या प्रगतीचे मूळ रयत शिक्षण संस्थेच्या शैक्षणीक कार्यात आहे, असे सांगितले.

या कार्यक्रमामध्ये उपस्थित मान्यवरांच्या हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. या वेळी रयत शिक्षण संस्थेचे जनरल बॉडी सदस्य वाय टी देशमुख, महेंद्र घरत, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, एस.के.कंगोरे, प्राचार्य डॉ. आमोद ठक्कर, उपप्राचार्य डॉ. आर.ए. पाटील, प्राध्यापक प्रवीण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणिकर, डॉ. यशवंत उलवेकर, डॉ. लक्ष्मण गवळी, प्राध्यापक सुनिता काटकर, प्राध्यापक ललिता अवचिते यांच्यासह महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर सेवक, विद्यार्थी आणि त्यांचे पालक उपस्थित होते.

# स्कुटी चोरणारा जेरबंद

**पनवेल : वार्ताहर**

स्कुटी गाडी चोरून पसार होण्याच्या प्रयत्नात असलेल्या चोरट्यास पनवेल वाहतूक शाखेच्या पथकाने विशेष नाका बंदी दरम्यान पकडल्याने त्यांच्या कडून अनेक चोरीच्या गाड्यांचे गुन्हे उघडकीस येण्याची श्यक्यता वर्तवण्यात येत आहे.



नवीन पनवेल येथील एचडीएफसी सर्कल या ठिकाणी पनवेल वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक औदुंबर भा.पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक पंधरे, पोलीस हवालदार कौले, साबळे, महिला पोलीस हवालदार भाटकर, पवार या पथकासोबत विशेष नाकाबंदीचे आयोजन करण्यात आले होते.

नाकाबंदीदरम्यान स्कुटी (एमएच ४६ सीबी ८४२२) वरील चालक विना हेल्मेट मिळून आल्याने सदर चालकास वाहन बाजूला घेण्यास सांगितले असता स्कुटीचालक हिसका देऊन पळून जाऊ लागले असता त्यास पाठलाग करून ताब्यात घेऊन वाहनाच्या कागदपत्र बाबत विचारपूस केली त्यावेळी स्कुटीचालक संशयितरित्या उत्तर देत असल्याने त्यास विश्वासात घेऊन अधिक चौकशी केली असता सदरचे वाहन हे चोरी करून पळून जात असल्याची कबूल दिली.

याप्रमाणे खांदेश्वर पोलीस स्टेशनच्या ताब्यात स्कुटी (एमएच ४६ सीबी ८४२२) व चालक यास पुढील योग्य त्या कारवाई करीता ताब्यात देण्यात आले आहे.



**पनवेल : कोकण मराठी साहित्य परिषदेचे वाङ्मयीन पुरस्कार नुकतेच जाहीर झाले. यात पनवेलचे साहित्यिक रोहिदास पोटे यांच्या गझलगंधाक्षरी या समीक्षा ग्रंथाला प्रभाकर पाध्ये स्मृती समीक्षा पुरस्कार जाहीर झाला आहे. याबद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत. या वेळी कोकण मराठी साहित्य परिषद नवीन पनवेल शाखेचे अध्यक्ष गणेश कोळी, प्रा. चंद्रकांत मढवी, अ‍ॅड. मनोज म्हात्रे उपस्थित होते.**





**पनवेल : मिडलक्लास हौसिंग सोसायटी मित्र मंडळाच्या वतीने झंकार नवरात्रोत्सव २०२५चे आयोजन करण्यात आले आहे. यंदाचे उत्सावाचे २०वे वर्ष आहे. या उत्सवात बुधवारी तिसऱ्या दिवशी दांडिया रसिकांचा भरघोस प्रतिसाद दिला. या वेळी माजी सभागृहनेते परेश ठाकूर, माजी नगरसेविका प्रिती जॉर्ज यांच्यासह इतर मान्यवर उपस्थित होते. दरम्यान तिसऱ्या दिवसाच्या विजेत्या स्पर्धकांना उपस्थित मान्यवरांच्या हस्ते बक्षीस देऊन गौरविण्यात आले.**

# रामशेठ ठाकूर महाविद्यालयातर्फे सायबर सुरक्षा जनजागृती



**खारघर : रामप्रहर वृत्त**

जनार्दन भगत शिक्षण प्रसारक संस्थेचे खारघर येथील रामशेठ ठाकूर वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयातील माहिती तंत्रज्ञान विभागातर्फे बुधवारी (दि.२४) श्री छत्रपती शिवाजी महाराज स्कूल, रोहिंजन येथे हॅक हॉल्ट या सायबर सुरक्षा व सायबर गुन्हे जनजागृती कार्यशाळेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते.

या कार्यशाळेत माहिती तंत्रज्ञान विभागातील प्रा. निलम मोरे, प्रा. मनीषा शिलेदार व प्रा. विवेक गरजे तसेच विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या कार्यशाळेमध्ये सुमारे १८१ विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेत सायबर सुरक्षेविषयी सखोल माहिती घेतली व विद्यार्थ्यांना खालील महत्त्वाच्या मुद्द्यांवर मार्गदर्शन करण्यात आले त्यामध्ये ऑनलाईन सुरक्षितता, सायबर धोके (फिशिंग, हॅकिंग), सायबर कायदे, सायबर फसवणूक, डिजिटल उपकरणांचा सुरक्षित वापर, डेटा हॅक होण्यापासून बचाव करण्याचे उपाय ही विद्यार्थ्यांना सांगितले.

महाविद्यालयाच्या प्रभारी प्राचार्या डॉ. महेश्वरी झिरपे यांनी या उपक्रमाचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल माहिती तंत्रज्ञान विभागातील सर्व प्राध्यापक आणि विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले. या उपक्रमाचे आयोजन प्रा. राजश्री म्हात्रे माहिती तंत्रज्ञान विभाग प्रमुख, यांनी केले तसेच विभागातील इतर सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहकार्य केले.





**पनवेल : महापालिकेचे माजी नगरसेवक राजू सोनी यांना वाढदिवसानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी माजी उपनगराध्यक्ष मदन कोळी आणि प्रभाग क्रमांक १९चे अध्यक्ष पवन सोनी, माजी नगरसेविका दर्शना भोईर, सुरेखा मोहोकर, सारीका भगत, सपना पाटील यांनीही सोनी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या.**



**पनवेल :** प्रखर राष्ट्रप्रेमी पं. दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती निमित्ताने महापालिकेच्या मुख्यालयात गुरुवारी त्यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. या कार्यक्रमास अतिरिक्त आयुक्त गणेश शेटे, परिवहन व्यवस्थापक कैलास गावडे, उपायुक्त स्वरूप खारगे, मंगला माळवे, मुख्य लेखाधिकारी मंगेश गावडे, मुख्य लेखा परीक्षक निलेश नलावडे, लेखा अधिकारी संग्राम व्होरकाटे, लेखा परीक्षक संदीप खुरपे, आस्थापना विभाग प्रमुख किर्ती महाजन, जनसंपर्क अधिकारी नितीन साके आदी उपस्थित होते.

# रोडपाली विभागात स्वच्छता मोहीम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

पनवेल महानगरपालिका, रविशेठ पाटील सामाजिक मंडळ, महाराष्ट्र एज्युकेशन सोसायटी शाळा, बारकूबाई नामदेव पाटील शाळा, स्त्री मुक्ती संघटना, RRWA यांच्या अंतर्गत स्वच्छता ही सेवा २०२५ पंडित दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंती निमित्त एक दिन एक तास एक साथ (Mega Cleanness Drive) विशेष स्वच्छता मोहीम सेक्टर १६ व्हॅलेंसिया सर्विस रोड (आदिवासी रोड) परिसरात महाराष्ट्र एज्युकेशन



सोसायटी शाळा, बारकुबाई पाटील शाळेतील शिक्षक व विद्यार्थी, नागरिक व स्वच्छता दूत यांच्या सहाय्याने तेथे विशेष स्वचछता मोहीम राबविण्यात आली.

या वेळी उपस्थिती भाजप नेते रविशेठ पाटील, नगरसेविका प्रमिलाताई पाटील, नगरसेवक अमर पाटील, राजेंद्र शर्मा, स्वच्छता निरीक्षक हरेश कांबळे, शिक्षक, विद्यार्थी, पर्यवेक्षक, कर्मचारी व नागरिक उपस्थित होते.



**पनवेल : जनसंघाचे संस्थापक पं. दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त नवीन पनवेल शहर मंडळ कार्यालयामध्ये त्यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून त्याना अभिवादन करण्यात आले. या वेळी मंडळ अध्यक्ष दशरथ म्हात्रे, माजी नगरसेवक एकनाथ गायकवाड, गणेश पाटील, मोतीलाल कोळी, सरचिटणीस भीमराव पोवार आदी उपस्थित होते.**




**पनवेल : एकात्मता, मानवतावाद आणि अंत्योदयाचे प्रणेते, प्रखर राष्ट्रप्रेमी पं. दीनदयाळ उपाध्याय यांची जयंती पनवेल तालुका व शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयात साजरी करण्यात आली. या वेळी भाजपचे ज्येष्ठ नेते श्रीनंद पटवर्धन, नगर परिषदेचे माजी आरोग्य सभापती उमेश पोद्दार, रूपेश नागवेकर यांच्यासह पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी अभिवादन केले.**

# पनवेलमध्ये गोष्ट सांगणे स्पर्धा उत्साहात

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

श्री. रामशेठ ठाकूर सामाजिक विकास मंडळ पनवेल पुरस्कृत व पंचायत समिती शिक्षण विभाग पनवेल आयोजित गोष्ट सांगणे स्पर्धा (स्वरचित व पारंपरिक) पनवेल पंचायत समिती कार्यालय येथे यशस्वीरीत्या पार पडली.



या स्पर्धेचे उद्घाटन गटशिक्षणाधिकारी सिताराम मोहिते यांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या अर्धपुतळ्यास पुष्पहार अर्पण करून आणि प्रभारी विस्तार अधिकारी विनोद ठाकूर यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून झाले. या स्पर्धेत पनवेल, तळोजे पाचनंद, ओवळे, पळस्पे व नेरे बीटमधील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता. स्वरचित व पारंपारिक अशा दोन प्रकारांमध्ये ही स्पर्धा पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या संकल्पनेतून आयोजित करण्यात आली.

या उपक्रमाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांच्या कलागुणांना व त्यांच्या अंगी असलेल्या ज्ञानरचनावादी वृत्तीला प्रोत्साहन देण्याचा त्यांचा प्रयत्न अत्यंत महत्त्वपूर्ण व स्तुत्य ठरला. लहान गट (इयत्ता २री ते ५वी) आणि मोठा गट (इयत्ता ६वी ते ८वी) अशा दोन गटांमध्ये पारंपरिक व स्वरचित गोष्ट या प्रकारांमध्ये विद्यार्थ्यांनी आपली कला सादर केली.

### विजेत्यांची नावे

**लहान गट (२री ते ५वी) : (पारंपरिक गोष्ट ) प्रथम - यशश्री घुले, द्वितीय - आराध्या शिंदे, तृतीय - नियती पाटील (स्वरचित गोष्ट) प्रथम - शरयू बांद्रे, द्वितीय - लक्ष पाटील, तृतीय - रुही शेंद्रे, मोठा गट (६वी ते ८वी) : (पारंपरिक गोष्ट) प्रथम - शर्वरी भोगले, द्वितीय - विधी पाटील, तृतीय - साक्षी चव्हाण (स्वरचित गोष्ट) प्रथम - निया सालमाडगे, द्वितीय - साहिल कांबळे, तृतीय - सोनाली शर्मा**

विजेत्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन करताना सिताराम मोहिते यांनी, अशा उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्त्व विकासाला व ज्ञानरचनावादी वृत्तीला चालना मिळते, असे सांगितले. या कार्यक्रमाला अंकिता हूदार, निंबाजी गीते, भालचंद्र पाटील, संदीप भोईर, संजय केणी, धनंजय ठाकूर, सरिता ठाकूर, काशिनाथ जाधव, अनंता म्हात्रे, सचिन पाटील, अविनाश पाटील आदी विविध बीटचे केंद्रप्रमुख, शिक्षक, पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. परीक्षक म्हणून पंकज पाटील, श्री. रणदिवे व श्री. ठाकूर यांनी काम पाहिले तर सूत्रसंचालन रंजना केणी यांनी केले.



**पनवेल : पं. दिनदयाळ उपाध्याय यांच्या जयंतीनिमित्त विशेष स्वच्छता मोहीम प्रभाग १९मध्ये आमदार प्रशांत ठाकूर यांच्या नेतृत्वाखाली राबविण्यात आली. या वेळी मनपा माजी महिला बालकल्याण सभापती दर्शना भोईर, स्वच्छता निरीक्षक रीना बहिरे, महेंद्र भोईर आदी उपस्थित होते.**

## संपादकीय

# लडाखमधील भडका

केंद्रशासित प्रदेश असलेल्या लडाखला पूर्ण राज्याचा दर्जा देण्याच्या मागणीसाठी लेह-लडाखमध्ये सुरू असलेल्या उपोषण आंदोलनाला बुधवारी हिंसक वळण लागले. आंदोलनादरम्यान जमावाने लेहमधील भाजप कार्यालयासह इतर काही कार्यालयांना व पोलिसांच्या गाड्यांना आग लावली. पर्यावरणवादी कार्यकर्ते सोनम वांगचुक यांनी भडक वक्तव्ये करून जमावाला भडकवल्याचा आरोप केंद्रीय गृहमंत्रालयाने केला असून त्यांच्या संस्थेचा परदेशी निधीचा परवाना रद्द करण्यात आला आहे.

**लडाखला राज्याचा दर्जा व भारतीय राज्यघटनेच्या सहाव्या अनुसूचीमध्ये समावेश करण्याच्या मागणीवरून लेह-लडाखमध्ये सुरू असलेल्या आंदोलनाला बुधवारी हिंसक वळण लागले. हिंसक आंदोलनात चार जणांनी जीव गमावला, तर ७०हून अधिक जण जखमी झाले. पर्यावरणवादी सोनम वांगचुक यांचे तेथे याच मागणीसाठी गेल्या १५ दिवसांपासून उपोषण सुरू होते. हिंसक आंदोलनानंतर त्यांनी उपोषण मागे घेतले. आंदोलनाला हिंसक वळण देण्याबद्दल गृहमंत्रालयाने वांगचुक यांनाच जबाबदार धरले आहे. वांगचुक यांच्या मागण्यांची दखल यापूर्वीच घेण्यात आली असून उच्चाधिकार समितीबरोबरच्या चर्चांमध्येही या मागण्यांचा समावेश आहे. अशा परिस्थितीत उपोषण सोडावे अशी विनंती अनेक राजकीय नेत्यांनी केली, पण त्याकडे दुर्लक्ष करत वांगचुक यांनी उपोषण सुरूच ठेवले व आंदोलकांना भडकवण्यासाठी विधानेही केली असे गृहमंत्रालयाने म्हटले आहे. मंगळवारी दोघा उपोषणकर्त्यांची प्रकृती बिघडली व त्यांना रुग्णालयात दाखल केल्यानंतर आंदोलकांचा उद्रेक झाल्याने जाळपोळ झाली असे सांगितले जाते. लडाखमधील विविध संघटनांच्या युवा आघाडीने बुधवारी बंदचे आवाहन केले होते. उपोषणस्थळी भाषणे सुरू असताना युवकांच्या एका गटाने घोषणाबाजी करत मोडतोड सुरू केली. यात काही वाहने तसेच भाजप कार्यालय पेटवून देण्यात आले. परिस्थिती नियंत्रणात आणण्यासाठी पोलिसांना गोळीबार करावा लागला. सरकार नेहमीच चर्चेला तयार असून आंदोलकांशी लगेच चर्चा केली जाण्याची शक्यता आहे. वांगचुक यांच्या प्रक्षोभक वक्तव्याने जमावाकडून हिंसाचार घडल्याचा आरोप सरकारने केला आहे. बुधवारी दुपारी चारपर्यंत तेथे परिस्थिती नियंत्रणात आल्याचे सांगण्यात आले. समाजमाध्यमांवर कोणीही प्रक्षोभक वक्तव्ये प्रसारित करू नयेत असे आवाहन करण्यात आले आहे. घटनेने दिलेले हक्क देऊन लडाखच्या जनतेच्या आशा-आकांक्षा पूर्ण करण्यासाठी सरकार वचनबद्ध असल्याचेही सरकारने स्पष्ट केले आहे. २०१९मध्ये कलम ३७० रद्द करण्यात आल्यानंतर जम्मू-काश्मीर व लडाख हे दोन केंद्रशासित प्रदेश निर्माण करण्यात आले होते. हिंसक आंदोलनानंतर वांगचुक यांच्या संस्थेने परदेशी निधीसंदर्भातील नियमांचे उल्लंघन केल्याच्या आरोपांवरून सीबीआयने चौकशी करण्यास सुरुवात केली आहे. वांगचुक यांचा आंदोलनामागील हेतू आणि त्यामागील पाकिस्तान कनेक्शनचीही चर्चा होते आहे. याच वर्षी ६ फेब्रुवारीला इस्लामाबादमध्ये झालेल्या संयुक्त राष्ट्रांच्या हवामान परिषदेत वांगचुक सहभागी झाले होते. या परिषदेत वांगचुक यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याविषयी कौतुकोद्गारही काढले होते. पाकिस्तानात जाण्यावरून वांगचुक यांना त्यावेळीही विचारणा झाली होती, परंतु त्यांनी पर्यावरणाला सीमा नसते अशी भूमिका घेतली होती. आता लडाखमधील हिंसाचारानंतर मात्र वांगचुक यांच्या पाकिस्तानभेटीकडे पुन्हा निर्देश होतो आहे. हिंसक आंदोलनाला जबाबदार असल्याचा गृहमंत्रालयाचा आरोप वांगचुक यांनी फेटाळला असून लेह-बंद आंदोलनादरम्यान शेकडो तरुण रस्त्यावर उतरले ही 'जेन झी' क्रांती असल्याचा दावा त्यांनी केला. दरम्यान, वांगचुक यांच्या संस्थेचा परदेशी निधीसंदर्भातील परवाना रद्द करून सरकारने त्यांच्याविरोधात कारवाईला सुरुवात केल्याचे दिसते आहे.**

# जल जीवन मिशन योजनेचा पैसा पाण्यात?

केंद्र सरकार पुरस्कृत जल जीवन मिशन अंतर्गत रायगड जिल्ह्यात राबविण्यात येत असलेल्या पाणीपुरवठा योजनेबद्दल आढवा घेण्यासाठी जिल्हाधिकारी कार्यालयात राजस्व सभागृहात १२ सप्टेंबर रोजी आयोजित केली होती. खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील, आमदार प्रशांत ठाकूर, जिल्हाधिकारी किशन जावळे, जि.प.च्या मुख्य कार्यकारी अधिकारी नेहा भोसले व इतर अधिकारी उपस्थित होते. या बैठकीत जल जीवन मिशन योजनेची काम पूर्ण न झाल्याबद्दल नाराजी व्यक्त करण्यात आली. योजना का रखडल्या, ज्या पूर्ण झाल्या आहेत त्यातून पाणीपुरवठा का होत नाही? शेवटच्या वाडीपर्यंत पाणी का जात नाही? पाणी कुठ मुरतंय याचा प्रशासनाने शोध घेऊन कार्यवाही केली पाहिजे. कोट्यवधी रुपये खर्च करून जनतेला पाणी मिळत नसेल, तर या योजनेचा पैसा पाण्यात गेला असेच म्हणावे लागेल.



जल जीवन मिशनची सुरुवात १५ ऑगस्ट २०१९ रोजी झाली. केंद्र शासनाच्या जल जीवन मिशनचा मुख्य उद्देश २०२४पर्यंत ग्रामीण भारतातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ कनेक्शनद्वारे स्वच्छ आणि पुरेसे पिण्याचे पाणी उपलब्ध करून देणे आहे. ग्रामीण भागातील प्रत्येक घरात वैयक्तिक नळ कनेक्शनद्वारे पाण्याची सोय करणे, प्रत्येक कुटुंबाला सुरक्षित आणि शुद्ध पिण्याचे पाणी पुरवणे, दररोज किमान ५५ लिटर प्रति व्यक्ती या दराने पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, ग्रे वॉटर व्यवस्थापन, जलसंधारण आणि पावसाच्या पाण्याची साठवण यांसारख्या उपाययोजनांद्वारे पाण्याच्या स्त्रोतांचे जतन करणे, पाण्याची व्यवस्थापन आणि देखभालीमध्ये समुदायाचा सक्रिय सहभाग घेणे हा या योजनेचा उद्देश आहे.

**खबरबात**
**प्रकाश सोनवडेकर**

रायगड जिल्ह्यात जल जीवन मिशनच्या १५३० योजना मंजूर आहेत. यापैकी ६२९ योजना पूर्ण झाल्या आहेत. योजनेंतर्गत एकेका ठेकेदाराकडे पंधरा-वीस योजना आहे. त्याही अपूर्णावस्थेत आहेत. १५३०पैकी ३७ योजना ठेकेदार रिस्पॉन्स देत नसल्याने रद्द करायच्या आहेत. जिल्ह्यातील ३६ जल जीवन योजनांना जागेची अडचण असल्याने त्या पूर्ण झालेल्या नाहीत. २६ ठिकाणच्या योजना रद्द करण्यात आलेल्या आहेत, कारण तेथील नागरिकांना विविध योजनेतून पाणीपुरवठा होत आहे, अशी माहिती या बैठकीत संबंधित अधिकाऱ्यांनी या बैठकीत दिली. त्यामुळे आमदार प्रशांत ठाकूर, खासदार धैर्यशील पाटील, आमदार रविशेठ पाटील यांनी अधिकाऱ्यांना धारेवर धरले. योजना पूर्ण होत नसल्याबद्दल नाराजी वक्त केली.

अनेक योजना अशा आहेत की टाकी बांधली व जलवाहिन्या टाकल्या, मात्र पाणी नाही. ठेकेदाराला पैसे मिळाले. जनतेला पाणी मात्र मिळत नाही. असे का झाले? योजना का रखडल्या? याची माहिती घ्यायला हवी. काही लोक मुद्दाम अडथळे आणतात. त्यांचा बंदोबस्त केला पाहिजे. काही ठिकाणी योजना पूर्ण करण्यासाठी पोलिसांची मदत घ्यावी लागत असेल तर ती घेतली पाहिजे. काही ठिकाणी चुकीची तांत्रिक मान्यता, चुकीचे इस्टिमेट देण्यात आले आहे. त्यामुळे योजना अपूर्ण आहेत. योजना अपूर्ण राहण्यास केवळ ठेकेदार जबाबदार नसून अधिकारीही जबबदार आहेत. त्यामुळे ठेकेदार व संबंधित अधिकाऱ्यांवरदेखील कारवाई झाली पाहिजे.

गावांमध्ये जलवाहिन्या टाकण्यात आल्या आहेत, परंतु गावांमध्ये पाणी पोहचत नाही. पाणी पोहचत नाही म्हणून या योजनांच्या दुरूस्त्या करण्यात आल्या. त्यावर आजवर करोडो रुपये खर्च करण्यात आले. असे असताना लोकांना गावांमध्ये पाणी पोहचत नाही. या गावातील महिलांना पाण्यासाठी वणवण भटकावे लागतेय. पाणीपुरवठा योजना असूनही गावांमध्ये पाणी का पोहचत नाही ते शोधून ही समस्या दूर केली पाहिजे. गावांमध्ये जाणाऱ्या जलवाहिन्यांना खुंट्या मारल्या आहेत त्या काढण्याचे धाडस प्रशासनाने दाखवले तरी बऱ्याच गावांना पाणी मिळेल.

# खालापूरची ग्रामदेवता साबाई माता

वर्षानुवर्षे चालत आलेल्या परंपरेनुसार खालापूरची ग्रामदेवता आई साबाई माता मंदिरात या वर्षीही नवरात्र उत्सव व साबाई मातेचा पालखी सोहळा मोठ्या थाटामाटात साजरा करण्यात येत आहे.



साबाई मातेचे मूळ स्थान मुंबई-पुणे हायेवलगत ढापनी गडावर आहे. दरवर्षी हनुमान जयंतीला साबाई मातेच्या ढापनी गडावर खालापूर ग्रामस्थ जात असतात. नवरात्रीच्या उत्सवात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन मंदिरात केले जाते. यामध्ये दररोज रात्री भजन, सप्तमीला रात्री बारा वाजता महाआरती केली जाते तसेच अष्टमीला मंदिरात नवचंडी होम केला जातो. पूर्वापार चालत आलेल्या परंपरेनुसार दसऱ्याच्या दिवशी मामलेदार (तहसीलदार) यांच्या हस्ते मंदिरात आपट्याची पाने रचून त्याची पूजा केली जाते. मामलेदारांनी आपट्याच्या पानांची पूजा केल्यानंतर सोने लुटण्याचा कार्यक्रम होतो. हे सोने लुटल्यांतर प्रथम ते देवीला अर्पण करून नंतर एकमेकांना दिले जाते.

दसऱ्याच्या दिवशी रात्री संपूर्ण गावात पालखीचे जागोजागी ग्रामस्थ स्वागत करतात व भक्तिभावाने दर्शन घेत असतात. नववधू व माहेरपणाला आलेली लेक देवीची ओटी भरूनच गावाची वेस ओलांडत असते. नवरात्रीमध्ये खालापूर गाव व पंचक्रोशीतील भाविक भक्त तसेच परराज्यातूनही मोठ्या प्रमाणात भाविक भक्त देवीची ओटी भरण्यासाठी साबाई मंदिरात येत असतात. हा सोहळा साजरा करण्यासाठी नागरिक मेहनत घेत असतात. नित्यनियमितपणे देवीची रोजची पूजा-अर्चा ही पुजारी राजू शशिकांत देसाई व त्यांच्या मातोश्री गं.भा. सरिता देसाई करत असतात, तर नित्यनेम त्यांना जगताप कुटुंबीय सहकार्य करत असतात.

**-दीपक जगताप**

# पळसदरी येथील पळसाई माता

कर्जत तालुक्यातील पळसदरी गावाच्या मागे असलेल्या जंगल भागात शिवकालीन अशी पळसाई देवीचे मंदिर असून मंदिराच्या आजूबाजूला असलेल्या झाडांमुळे सतत सावली असते आणि त्यामुळे तेथील निसर्गसौंदर्य पाहण्यासारखे आहे. त्यात पावसाळ्यात धबधबे तसेच तलावामुळे येणारे पर्यटकांची रेलचेल असते. देवीच्या कृपेने गावात समृद्धी व शातंता आहे अशी ग्रामस्थांची धारणा आहे.



शिवकालीन पळसाई माता पळसदरीची ग्रामदेवता आहे. सर्व समाजबांधव मोठ्या भक्तीभावाने पूजा-अर्चा करीत असतात. पळसदरी परिसरातील सर्व धर्मियांची ग्रामदेवता म्हणून पळसाई देवी प्रसिद्ध आहे. सुमारे ५०० वर्षापूर्वीची सुबक मूर्ती असून पूर्ण शेंदुराने भरली होती. एका भक्ताने शेंदुर काढण्याचा प्रयत्न केला असता आतमध्ये सुबक मूर्ती असल्याचे लक्षात आले.

देवी शिवकालीन असून त्या काळात यवनांनी मोडतोड केल्याने मंदिराच्या मागील बाजूस आजही खाणाखुणा दिसून येतात. पळसदरी गाव सह्याद्रीच्या कुशीत दोन डोंगरांमध्ये दरीत वसल्याने व विपुल प्रमाणात पळसाची संपत्ती असल्याने काही लोक पूर्वी पत्रावळीचा व्यवसाय करीत असत. देवीच्या मुखासमोरील डोंगर शिवकालीन शिवनेरी किल्ला म्हणून ओळखला जातो.

फार पूर्वीपासूनच या पळसाई देवीच्या मंदिरात नवरात्रीत जागर भजन, कीर्तन होत असते. अलीकडे सन १९९०पासून नवरात्रोत्सव मंडळाच्या वतीने रास गरबा, जागर गोंधळ, होमहवन, भजन होत आहे. २०१२-१३ साली ग्रामस्थांनी मंदिराचा जीर्णोद्धार केला. वैशाख शुध्द पंचमीला भव्य पालखी सोहळा उत्सव साजरा होत असतो. नवसाला पावणारी देवी म्हणून पळसाई देवीची भाविकांमध्ये श्रद्धा आहे.

**-विजय मांडे**

## बदलते तंत्रज्ञान

# बीएसएनएल नेटवर्क ५जी सेवेसाठी मुहूर्त ठरला...

आज येईल, उद्या येईल असे करता करता बीएसएनएल ४जी नेटवर्कच्या लॉंचिंगचा मुहूर्त ठरला आहे. २७ सप्टेंबरला बीएसएनएल देशभरात ४जी सेवा सुरू करत आहे. याबाबतची घोषणा बीएसएनएलने एक्स अकाऊंटवरून केली आहे.




बीएसएनएलने गेल्या वर्षभरापासूनच ४जी रेडी क्षमतेची सिमकार्ड वाटण्यास सुरुवात केलेली आहे, परंतु प्रत्येक वेळेला ४जी सेवा सुरु करण्याचा मुहूर्त टळला जात होता. यंदा १५ ऑगस्टची तारीखही हुकली होती. अखेर आता २७ सप्टेंबरला ४जी सेवा सुरू करत असल्याचे बीएसएनएलने म्हटले आहे.

अजूनही बीएसएनलची सेवा सो-सोच आहे. फोन आला तर उचलण्यापूर्वीच कट होत आहे, बोलण्यास सुरुवात केली तर समोरच्याचा आवाज आपल्याला आणि आपला आवाज समोरच्याला ऐकायला येत नाहीय. इंटरनेट कनेक्टीव्हीटीच नाही तर फोनमध्ये रेंजचेदेखील वांदे आहेत. रिलायन्स जिओ, एअरटेल, व्होडाफोन या कंपन्यांनी त्यांची रिचार्ज महाग केली आहेत. अर्थात, या कंपन्या ग्राहकांना ४जी, ५जी सेवा देत आहेत, तर बीएसएनएल अजूनही रडतखडत ३जी सेवाच देत आहे.

गावखेड्यातील ग्राहक बीएसएनएलच वापरत आहेत. या लोकांना आता बीएसएनएल ४जीचा फायदा होणार आहे. बीएसएनएलचे अध्यक्ष आणि व्यवस्थापकीय संचालक ए रॉबर्ट जे रवी यांनी बीएसएनएल ४जी सेवा देशव्यापी लॉंच करण्याची घोषणा केली आहे. बीएसएनएलची ४जी सेवा वापरण्यासाठी ग्राहकांना त्यांचे सिमकार्ड ४जीमध्ये बदलून घ्यावे लागणार आहे. तसेच ४जी फोन घ्यावा लागणार आहे. कंपनी रिचार्जचे दर वाढविणार की नाही, हे अद्याप समोर आलेले नाही.


यानंतर ४जी नेटवर्क ५जीमध्ये अपग्रेड केले जाईल. स्वत:चे ४जी तंत्रज्ञान विकसित करणाऱ्या जगातील पाच देशांमध्ये भारताचा समावेश झाला आहे. हे कौशल्य ५जीपर्यंत वाढविण्याचे सरकारचे उद्दिष्ट आहे. कंपनीचे ४जी नेटवर्क बसविण्याची जबाबदारी सॉफ्टवेअर निर्माता टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेस यांच्या नेतृत्वाखालील कन्सोर्टियमकडे आहे. गेल्या काही महिन्यांत कंपनीने काही नवीन सेवा सुरू केल्या आहेत.

# थोर समाजसुधारक पं. ईश्वरचंद्र विद्यासागर

महान समाजसुधारक आणि बंगालच्या पुनर्जागरणातील एक प्रमुख व्यक्तिमत्व म्हणून पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांची ओळख राहिली आहे. त्यांची आज जयंती.

पं. ईश्वरचंद्र विद्यासागर यांचा जन्म २६ सप्टेंबर १८२० रोजी ठाकूरदास बंदोपाध्याय आणि भगवती देवी यांच्या पोटी बंगाल प्रेसिडेन्सीच्या बिरसिंघा गावात झाला. लहानपणी ते हुशार विद्यार्थी होते आणि त्यांना ज्ञानाची तीव्र तहान होती. त्यांनी कलकत्ता येथील संस्कृत महाविद्यालयात शिक्षण घेतले आणि कायद्याची परीक्षाही उत्तीर्ण केली. १८४१मध्ये ते फोर्ट विल्यम कॉलेजमध्ये २१व्या वर्षी संस्कृत विभागाचे प्रमुख म्हणून रुजू झाले. ते संस्कृत, हिंदी, बंगाली आणि इंग्रजीचे विद्वान विद्वान होते. शिक्षक असण्याबरोबरच ते अनुवादक, लेखक, तत्त्वज्ञ, उद्योजक आणि परोपकारी देखील होते. त्यांनी 'बोर्नो पोरीचॉय' लिहिले, जे आजही भाषेच्या नवशिक्यांना बंगाली वर्णमाला शिकवण्यासाठी वापरले जाते. बंगाली अक्षरे लिहिण्याच्या आणि शिकवण्याच्या पद्धतीत त्यांनी क्रांती केली.

एक शिक्षक या नात्याने विद्यासागर यांनी आपल्या विद्यार्थ्यांना भारतीय आणि पाश्चात्य तत्त्वज्ञान शिकण्यासाठी आणि दोन्हीपैकी सर्वोत्तम तत्त्वज्ञान आत्मसात करण्याचे आवाहन केले. त्यांनी सर्वांसाठी संस्कृत महाविद्यालयाचे दरवाजे उघडले.



**निमित्त**

प्रवेश शुल्क आणि शिक्षण शुल्क या संकल्पना मांडणारे ते बंगालमधील पहिले व्यक्ती होते. अध्यापनाच्या दर्जात आणि पद्धतींमध्ये एकसमानता यावी म्हणून त्यांनी शिक्षक प्रशिक्षण विद्यालयाची स्थापना केली. ते स्त्री शिक्षणाचे पुरस्कर्ते ही होते. ज्या महाविद्यालयातून त्यांनी पदवी घेतली त्या महाविद्यालयातील चमकदार कामगिरीमुळे त्यांना संस्कृत महाविद्यालयातून 'विद्यासागर' ही पदवी मिळाली. विद्यासागरचा शब्दशः अर्थ 'ज्ञानाचा सागर' असा होतो.

बंगालमधील शिक्षणाच्या आधुनिकीकरणाच्या कार्यासोबतच त्यांनी महिलांच्या हिताचे कामही केले. विधवांवर कठोर निर्बंध लादणाऱ्या सनातनी व्यवस्थेविरुद्ध त्यांनी लढा दिला. विधवांना त्यांचे डोके मुंडणे आणि सर्व वेळ पांढरे कपडे घालणे आवश्यक होते. त्यांना त्यांच्या घराबाहेरही फिरण्याची परवानगी नव्हती आणि त्यांना कठोर घरगुती कामगार आणि अर्ध-उपाशी जीवन जगावे लागले. विद्यासागर यांना या अन्यायाचा राग आला आणि त्यांनी विधवा पुनर्विवाहाची बाजू मांडली, ज्याला त्या वेळी परवानगी नव्हती. १८५६मध्ये हिंदू विधवा पुनर्विवाह कायदा पास करण्यासाठी त्यांनी ब्रिटीश अधिकाऱ्यांवर दबाव आणला. तो ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीत पास झाला.

विद्यासागर यांना समाजातील सनातनी घटकांनी जवळजवळ पाखंडी म्हणून पाहिले होते, मात्र त्यांनी अनेक मासिके आणि प्रकाशनांद्वारे त्यांची मते आणि मतांचे समर्थन करणे सुरू ठेवले.

वयाच्या १४व्या वर्षी (त्यावेळच्या प्रथेप्रमाणे) दिनमणी देवीशी त्यांचा विवाह झाला. या जोडप्याला नारायण चंद्र हा मुलगा होता. विद्यासागर यांनी आपल्या मुलाचे लग्न एका विधवेशी लावले. त्यांनी बेताल पंचबिंसती, बोर्नो पोरीचॉय, बंगला-र इतिहास, उपक्रमणिका इत्यादी अनेक पुस्तके लिहिली. त्यांनी शोम प्रकाश हे बंगाली वृत्तपत्रही सुरू केले. जुलै १८९१मध्ये वयाच्या ७०व्या वर्षी प्रकृती अस्वास्थ्यामुळे त्यांचे निधन झाले.

**(साभार : इंटरनेट)**


## चित्र रंगवा



## आरोग्य प्रहर

# महिलांना ब्रेन फॉगचा त्रास; हे आहेत उपाय

वयाच्या चाळीशीचा टप्पा ओलांडल्यानंतर महिलांच्या शरीरात अनेक बदल घडू लागतात. या सगळ्या बदलांमध्ये महिलांना प्रामुख्याने मेंदूशी संबंधित काही बदलदेखील दिसून येतात. या समस्यांपैकी एक समस्या म्हणजेच ब्रेन फॉग. यामध्ये महिलांना अनेकदा छोट्या-छोट्या गोष्टी विसरण्याचा, कामावर लक्ष केंद्रित न होण्याचा आणि सतत थकल्यासारखे वाटण्याचा त्रास होतो. हा काही गंभीर आजार नसला तरी तुमच्या रोजच्या जीवनावर याचा मोठा परिणाम होऊ शकतो.



हार्मोनल बदल, वाढलेला ताण, झोपेची कमतरता आणि लाईफस्टाईलमधील काही सवयी यामागे मोठ्या प्रमाणावर कारणीभूत ठरतात. योग्य काळजी घेतली तर या समस्येवर मात करणे सहज शक्य होते. हा कोणताही आजार नाही, परंतु याकडे दुर्लक्ष केल्यास मेंदूच्या कार्यक्षमतेवर परिणाम होऊ शकतो. ब्रेन फॉगची समस्या असली तरीही घाबरून जाण्याची गरज नाही. काही सोपे उपाय आणि चांगल्या सवयी स्वतःला लावून आपण या समस्येवर नियंत्रण मिळवू शकता आणि मेंदू पुन्हा सक्रिय ठेवू शकता. ब्रेन फॉग म्हणजे नेमकं काय आणि ही समस्या कमी करण्यासाठी नेमकं काय करता येऊ शकत ते पाहूयात.

कोकिलाबेन धीरूभाई अंबानी हॉस्पिटल, नवी मुंबई येथील मानसोपचार तज्ज्ञ डॉ. पार्थ नागदा यांच्या मते, अनियमित झोपेचे वेळापत्रक, रात्री उशिरापर्यंत जागे राहणे, स्ट्रेस, जास्त स्क्रीन टाइम, सोशल मीडियाचा अतिवापर आणि गोड पदार्थ जास्त खाल्ल्याने ब्रेन फॉगची लक्षणे वाढू शकतात.

दररोज सात ते आठ तास झोपण्याची सवय लावा आणि झोपण्याची व उठण्याची वेळ निश्चित करा. आहारात भरपूर फळे, हिरव्या भाज्या, धान्ये आणि ओमेगा-३ फॅटी सिडचा समावेश करा. गोड पदार्थ, अल्कोहोल आणि जंक फूड खाणे संपूर्णपणे टाळा. दिवसभर पुरेसे पाणी प्या, कारण शरीरात पाण्याची कमतरता मेंदूची कार्यक्षमता कमी करते. रोज कमीत कमी ३० मिनिटे चाला किंवा एक्सरसाइज करा, ज्यामुळे मेंदूतील रक्तप्रवाह वाढेल आणि विचार करण्याची क्षमता सुधारेल. अभ्यास किंवा कामाच्या दरम्यान छोटे-छोटे ब्रेक घ्या आणि डिजिटल उपकरणांपासून थोडा वेळ दूर रहा. मेडिटेशन (ध्यान), माइंडफुलनेस किंवा तुमच्या आवडत्या छंदातून स्वतःल थोडा विरंगुळा करण्यासाठी वेळ द्या. जर ही लक्षणे बराच काळ टिकून राहिली किंवा ती वाढत असतील, तर डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

# आदिवासींच्या वनहक्कांबद्दल संवेदशील राहणार -खासदार धैर्यशील पाटील

**पेण : प्रतिनिधी**

देशाला स्वातंत्र्य मिळविण्यात आदिवासी समाजाचे बलिदान होते हे आपण विसरून चालणार नाही तसेच त्यांच्या वनहक्क प्रश्नाबद्दल मी संवेदनशील आहे, असे प्रतिपादन राज्यसभा खासदार धैर्यशील पाटील यांनी काढले ते अंकुर ट्रस्ट आयोजित चिरनेर जंगल सत्याग्रहातील आदिवासी हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या स्मृतिदिनी पेण येथे बोलत होते.



या वेळी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील, सहाय्यक प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे, पेण तालुका आदिवासी समाज अध्यक्ष जोमा दरोडा बाळाराम नाईक, बाजार समिती सभापती महादू मानकर, बाजार समिती सदस्य संदेश ठाकूर, स्वप्नील म्हात्रे, नीरा वीर, संजय नाईक विविध ग्रामपंचायत आदिवासी सरपंच, कर्मचारी उपस्थित होते.

अंकुर ट्रस्टच्या वतीने पेण येथे १९९७मध्ये हुतात्मा नाग्या महादू कातकरी यांच्या बलिदानाची दखल घेऊन आदिवासींच्या वनहक्क आणि हक्कांसाठी चळवळ सुरू केली होती. आज २७ वर्षांनी, या चळवळीला समाजाचे आणि शासनाचे अधिक प्रोत्साहन मिळत आहे. अंकुर ट्रस्ट आणि कातकरी आदिवासींच्या या ऐतिहासिक संघर्षाची आठवण म्हणून आदिवासींच्या पारंपरिक वेशभूषेत एक भव्य रॅली आयोजित केली गेली. सदर रॅलीत शेकडो आदिवासी बांधव आपले पारंपरिक ढोल, ताशे व वाद्य घेऊन सहभागी झाले होते. या रॅलीत विविध वेशभूषा केलेल्या आदिवासींनी पेणकरांचे लक्ष वेधले.

या रॅलीनंतर महात्मा गांधी वाचनालय पेण येथे आदिवासींची सभा महात्मा गांधी वाचनालयात आयोजित करण्यात आलेली होती. या सभेत प्रस्तावनेत ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या डॉ. वैशाली पाटील म्हणाल्या आता आपल्याला फक्त जंगल वाचवायचे नाही, तर आपला उत्पन्न मिळवण्याचा मार्गही मजबूत करावा लागेल. या करिता आपल्या सामूहिक वनहक्क मिळालेल्या जंगलात आपण विकासाचे आराखडे मंजूर करून घेणे गरजेचे आहे. जंगल वाचले तरच आदिवासींचे आदिवासीपण राहणार आहे नाही तर होऊ घातलेल्या तिसऱ्या मुंबईमध्ये आपण धुवून निघू. महाराष्ट्रात वातावरण बदलाच्या परिणामांना सामना करण्यासाठी जंगल वाचले पाहिजे हीच आपल्या हुतात्म्याला खरी श्रद्धांजली आहे, असे त्यांनी सांगितले. या वेळेस विविध आदिवासी गावपातळीवरील कार्यकर्त्यांनी सहाय्यक प्रकल्प अधिकारी तेजस्विनी गलांडे यांना निवेदन दिले. यावर श्रीमती गलांडे यांनी सामूहिक वन हक्क आराखडा प्रश्न कार्यवाही करण्यासाठीचे आश्वासन दिले. जोमा दरोडा यांनी आदिवासीच्या विकासात अंकुर ट्रस्टच्या योगदानाविषयी गौरव काढले.

या सभेस हुतात्मा नाग्या कातकरी, आयटीआय पेण, चाईल्ड हेवन, युवा परिवर्तन संस्था, कातकरी समाज संघटना आदीचे प्रतिनिधी उपस्थित होते.

## भटक्या कुत्र्याच्या हल्ल्यात विद्यार्थिनी जखमी

**खोपोली : प्रतिनिधी**

शिळफाटा येथील सह्याद्री विद्यालयाच्या रस्त्यावर भटक्या कुत्र्यांचा हायदोस सुरू असून, रात्री अपरात्री जाताना नागरिकांना जीव मुठीत घेऊन जावे लागते. बुधवारी दुपारी शाळेत जाताना वेदिका मधुकर साळुंखे साळुंके या सहावी असणाऱ्या विद्यार्थिनीच्या भटक्या कुत्र्याने चावा घेतला. या घटनेमुळे विद्यार्थ्यांमध्ये खळबळ उडाली आहे.

या कुत्र्यांचा बंदोबस्त करावा, असे सह्याद्री विद्यालयाच्या मुख्याध्यापकांनी नगरपरिषदेला पत्र लिहिले आहे. तातडीने कार्यवाही करावी, अशी विनंती या पत्राद्वारे करण्यात आली आहे. खोपोली शहराच्या विविध भागात सध्या भटक्या कुत्र्यांचा हैदोस असून, झुंडी झुंडीने फिरून दशहत माजवण्यचा, त्यांचा प्रयत्न असल्याने पालिका प्रशासनाने ताबडतोब बंदोबस्त करावा, अशी मागणी परिसरातील नागरिकांकडून करण्यात येत आहे.



## भिलवले येथे टेम्पोच्या धडकेत एकाचा मृत्यू

**मोहोपाडा : प्रतिनिधी**

भिलवले चौक हद्दीत भरधाव येणाऱ्या टेम्पोने दोन मोटरसायकलस्वारांना जोरदार धडक दिली. यात संजय भिकू भस्मा (रा. पोखरवाडी, ता. खालापूर) यांचा जागीच मृत्यू झाला, तर अन्य दोघे जण गंभीर जखमी असून त्यांच्यावर पनवेल येथील खासगी रुग्णालयात उपचार सुरू आहेत. टेम्पोचालक अपघातानंतर पसार होण्याचा प्रयत्न करत असताना चौक पोलीस पथकाने त्याला ताब्यात घेतले.

हा अपघात इतका भीषण होता की, मृत संजय भस्मा हे चिरडले गेले. संजय भस्मा हे बाजारासाठी चौक येथे जात होते. त्यांच्या पश्चात दोन लहान मुले असून या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कर्जत-चौक रस्त्याचे काम गेल्या अनेक दिवसांपासून सुरू असून रस्त्यावर मोठ्या भेगा पडल्या आहेत. काही ठिकाणी रस्ता पूर्ण झाल्यानंतरही दिशादर्शक पट्टे किंवा लावलेले नाहीत, त्यामुळे भरधाव वाहनचालकांकडून वारंवार अपघात होत आहेत. म्हणून उपाययोजनेची मागणी होत आहे.

## कर्जत चारफाट्यावरील हायमास्ट सुरू

**कर्जत : प्रतिनिधी**

कर्जतचे प्रवेशद्वार असलेल्या चारफाट्यावरील हायमास्ट गेली अनेक महिने बंद आहे. यासाठी अनेक संस्था, समुहांनी हा हायमास्ट दुरुस्तीची मागणी केली होती. तर काही सामाजिक कार्यकर्त्यांनी त्याचा पाठपुरावा केला, मात्र अनेक वायद्यानंतर या हायमास्टच्या दुरुस्तीचे काम हाती घेण्यात आले असून आज या हायमास्टचा प्रकाश चारफाटा परिसरात पडला.

हा हायमास्ट सुमारे दीड वर्षे बंद होता. तो सुरु करावा अशी मागणी अनेक संस्था, समूहांनी निवेदनद्वारे केली होती. त्याचा पाठपुरावा सामाजिक कार्यकर्त्यांनीही सुरू ठेवला होता. त्यांना १० सप्टेंबर, १२ सप्टेंबर अशा सुरू करण्याच्या तारखा देण्यात आल्या होत्या. प्रत्यक्षात हायमास्ट दुरुस्तीचे साहित्य उपलब्ध होत नसल्याने तो दुरुस्त होत नव्हता. २६ सप्टेंबरच्या संध्याकाळपर्यंत हायमास्ट दुरुस्त होईल असे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून सांगण्यात आले होते. त्यानुसार साहित्य उपलब्ध झाल्यानंतर आज २५ सप्टेंबर रोजी सकाळ पासून दुरुस्तीचे काम सुरू होते.

दुपारी तीनच्या सुमारास दुरुस्तीचे काम सुरू होऊन चारफाटा परिसर प्रकाशमय झाला. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या वतीने हे दुरुस्तीचे काम करण्यात आले आहे.




## खोपोलीत जुगार खेळणारे १७ जण ताब्यात

**खोपोली, खालापूर : प्रतिनिधी**

खोपोली पोलीस ठाण्याच्या हद्दीतील एका फ्लॅटमध्ये पहाटे पोलिसांनी धाडसत्र केला असता जुगार खेळणाऱ्या १७ जणांना ताब्यात घेतले आहे. या जुगाऱ्यांमध्ये काही माजी नगरसेवकांचा व राजकीय पक्षांच्या पदाधिकाऱ्यांचा समावेश असल्याने, त्या पक्षांच्या नेत्यांचे पोलीस ठाण्यामध्ये धावाधाव सुरू आहे.

नगरपालिका हद्दीतील काटरंग येथे एका राजकीय पक्षाच्या युवक पदाधिकाऱ्यांच्या फ्लॅटमध्ये जुगार सुरू असल्याची गुप्त खबर मिळतात पोलीस निरीक्षक सचिन हिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस पथकाने धाडसत्र केले असता त्यात एकूण १७ जण त्या ठिकाणी जुगार खेळताना सापडले पोलिसांनी त्यांच्याकडील चार लाख ५० हजार रुपयांच रोख हस्तगत केले असून त्यानंतर त्या सतरा जणांना पोलीस ठाण्यात आणण्यात आले आहे. फ्लॅटच्या मालकाच्या मुलालाही ताब्यात घेण्यात आले आहे. ही खबर खोपोलीत पसरतात राजकीय पक्षांची नेत्यांची धावाधाव सुरु झाली. पोलिसांचा जाबजबाब सुरू असून त्यामुळे या पकडलेले पुढाऱ्यांची नावे समजली नाहीत.

रायगड जिल्ह्याच्या पोलीस अधीक्षक आंचल दलाल यांनी रायगड जिल्ह्यात अवैध व्यवसाय पूर्णपणे बंद केल्यामुळे या व्यवसायातील मंडळींचे धाबे दणाणले आहेत. त्यामुळे की काय आता चार भिंती आड व्हाईट कॉलरवाले जुगार खेळताना पकडल्यामुळे आणखीनच चर्चा वेगाने सुरु आहे. या प्रकरणाचा पोलीस निरीक्षक सचिन अहिरे यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.



**माणगाव : तालुक्यातील उसुरघर गावातील उच्चशिक्षित युवती श्रद्धा दीपक ढेपे हिने नवरात्रोत्सवाच्या पार्श्वभूमीवर साकारलेली रंगीत रांगोळीतील महालक्ष्मीची प्रतिमा पाहणाऱ्यांना थक्क करणारी ठरली. हुबेहूब जिवंत भासणाऱ्या या कलाकृतीतून तिच्या प्रतिभेचा आणि मेहनतीचा प्रत्यय आला.**

# लोहारे, देवळे प्रभागांतील ४३ ग्रामसंघामध्ये महिला बचत गटांसाठी कर्जवाटप

**पोलादपूर : प्रतिनिधी**

पोलादपूर तालुक्यातील लोहारे आणि देवळे प्रभागांतील ४३ ग्रामपंचायतींतर्गत ४३ ग्रामसंघांमध्ये ५२८ महिला बचतगटांसाठी दोन कोटी १० लाखांचे बँक कर्जवाटप झाले असून महिलांमध्ये उद्यमशीलतेसोबतच समाजभान निर्माण होण्याची 'उमेद' वाढल्याचे दिसून येत आहे.

केंद्रसरकारने राष्ट्रीय ग्रामीण जीवन्नोनती अभियानाची सुरूवात २०११ मध्ये केली. महाराष्ट्र राज्यात या अभियानाची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्यमंत्री महोदयांच्या अध्यक्षतेखाली ग्रामविकास विभागांतर्गत महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवन्नोनती अभियान 'उमेद' या स्वतंत्र संस्थेची स्थापना करण्यात आली आहे. पोलादपूर तालुक्यात या 'उमेद' स्वतंत्र संस्थेंतर्गत काम उशिरा सुरू झाले.

पोलादपूर तालुक्यातील लोहारे जिल्हा परिषद प्रभागांतर्गत २३ ग्रामसंघांमध्ये एकूण २६२ महिला स्वयंसहायता गट तसेच महिला बचतगट आहेत. या बचतगटांमध्ये ७२ लाख खेळते भांडवल आहे. समुदायनिधी एक कोटी ५२ लाख ४०हजारांचा असून जोखीम प्रवणता निधी दोन लाख २५ हजार रूपये आहे. बीज भांडवल १२ लाख ५१ हजार रूपये आहे. खाद्यपदार्थ निर्मितीचा प्रोड्यूसर ग्रुप अस्तित्वात असून त्यासाठी ५० हजारांचा निधी आहे. ग्रामसंघ व्यवस्थापन निधी ११ लाख २५ हजार रूपयांचा आहे. लोहारे प्रभागसंघ व्यवस्थापन निधी दोन लाख रूपयांचा आहे.

देवळे प्रभागसंघांतर्गत 'उमेद'चा कार्यक्रम यशस्वी झाल्यानंतर आता लोहारे प्रभाग संघाच्या महिला बचतगटांचे तसेच ग्रामसंघांचे 'उमेद' कार्यक्रमाचे नजिकच्या काळात आयोजन केले जाणार आहे. कार्यक्रम कितीही यशस्वी झाले तरी नोकरीनिमित्त शहराकडे गेलेल्या पुरूषांविना संसाराचे चाक ओढण्यासाठी पोलादपूर तालुक्यातील महिला बचतगटाच्या सदस्यमहिला आता सज्ञच नव्हे तर पुरूषांनाही 'खेड्याकडे चला' महात्मा गांधीजींचा मंत्र अमलात आणण्यास भाग पाडण्यास सुसज्ञ झाल्याचे समाधान दिसून येत आहे.




## आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते सीएफआयच्या नवीन वास्तूचे उद्घाटन

**पेण : प्रतिनिधी**

सीएफआयच्या नवीन वास्तूचे उदघाट्न आमदार रविशेठ पाटील यांच्या हस्ते व खासदार धैर्यशील पाटील, सिडकोचे माजी अध्यक्ष प्रमोद हिंदुराव, सीएफआयचे अध्यक्ष संदेश म्हात्रे यांच्या उपस्थितीत करण्यात आले.



या वेळी सीएफआय पेण शाखेचे कार्यकारी अधिकारी डॉ. किशोर देशमुख, राष्ट्रवादी काँग्रेस अध्यक्ष दयानंद भगत, सौ, ज्योती हिंदुराव, शिक्षणाधिकारी अरुणादेवी मोरे, माजी नगरसेवक दिलीप लाड, माजी नगरसेवक प्रकाश शिंगरूत, माजी जि. प. सदस्य डी. बी. पाटील, अण्णा वनगे, रोटरी अध्यक्ष सचिन शिगवण आदींसह मान्यवर उपस्थित होते.

या वेळी आमदार रविशेठ पाटील यांनी शुभेच्छा देताना सांगितले की, सीएफ आयच्या मध्यमातून डॉ. किशोर देशमुख यांनी जनसेवेचे कार्य हाती घेतले असून त्यांच्या मदतीमुळे आदिवासी समाजातील एक मुलगा उपअभियंता पदावर काम करीत आहे. संस्थेच्या मध्यातून अनेक वियार्थ्यांनी अनेक विद्यार्थ्यांनी आपली प्रगती साध्य केली असून असेच कार्य डॉ. किशोर देशमुख यांच्या हातून घडत राहो, अशा शुभेच्छा या वेळी रविशेठ पाटील यांनी दिल्या.

या वेळी डॉ. ओम पाटील, बासरी वादक तेजस घरत, उपअभियंता उत्तम डोके, सुप्रिया मुंढे, सिद्धी एरंडे, संतोषी पाटील, सुशांत खाकर आदींसह सीएफ आयच्या माध्यमातून प्रगती साधलेल्या विद्यार्थ्याचचा सत्कार या वेळी मान्यवरांचा हस्ते करण्यात आला.

## रक्तदान शिबिर उत्साहात

**धाटाव : प्रतिनिधी**

रसायन उद्योगातील आघाडीची डीएमसीसी कंपनीचा १०७वा वर्धापन दिन गुरुवारी (दि.२५) मोठ्या उत्साहात साजरा झाला. या औचित्याने आयोजित कार्यक्रमात कंपनीचे साईड हेड किरण हिंगणे यांनी कामगारांना मार्गदर्शन केले. तसेच सामाजिक जबाबदारीची जाणीव ठेवत कंपनीतर्फे रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये तब्बल १०७ बाटल्या रक्तदान संकलित झाल्या असून कामगारांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तर कंपनीचे एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर कुलदीप तिवारी, परचेस डिपार्टमेंट हेड मोहन पवार यांनी कामगारांना शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, कंपनीचे एच.आर. मॅनेजर अनिल जांभळे म्हणाले की, वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनामुळे डीएमसीसी कंपनीने नेहमीच सामाजिक क्षेत्रात आजूबाजूच्या परिसराशी सलोख्याचे नाते ठेवले आहे. कंपनीत उत्पादन करताना कामगारांची सेफ्टी हेच आमचे पहिले प्राधान्य आहे. मग तो कायमस्वरूपी असो वा कंत्राटी कामगार - सर्वांना समान सुविधा आणि ट्रीटमेंट दिली जाते.

## हॉटेल कामगाराचा मृतदेह आढळला

**मुरूड :** शहरातील प्रसिद्ध हनुमान हॉटेलमधील कामगार शीतला रामपाल प्रसाद (वय २८) या कामगाराचा मुरूड कब्रस्थानजवळ त्याचा मृतदेह आढळून आला. या बाबतची खबर नरेंद्र धीरेंद्र सिंग यांनी मुरूड पोलिसांना दिली आहे. याबातच तपास मुरूड पोलीस करीत आहेत. हा कामगार उत्तरप्रदेश येथील असून तो या हॉटेलमध्ये काम करीत होता.


## CHANGE OF NAME

I the undersigned **Priyanka Amal** (Old name) residing At Flat no. B/103,Madhuram Complex , Plot NO 76/77, Sector no -19 Kamothe, Navi Mumbai, Tal Panvel, Dist Raigad,410206**,** I Changed my Name after marriage by the **AffIdavIt No. 30387** dated **13/09/2025** So that I remitter issue /may here after be called by new Name **Priyanka P Subhash**

Sign. by New Name
**Priyanka p subhash**


## पनवेल महानगरपालिका

**ता. पनवेल, जि. रायगड, पिन नं. ४१० २०६**

कार्यालय :-२७४५८०४०/४१/४२ फॅक्स नं:- ०२२-७४५२२३३
ई मेल:- panvelcorporation@gmail.com वेबसाईट: www.panvelcorporation.com

जा.क्र./पमपा/पापुवि/३५२५/प्र.क्र.१४/१०५६/२०२५ दिनांकः-२५/०९/२०२५

**अंदाजपत्रक बनविणेकामी**

| अ.क्र | प्रकरण क्र. | कामाचे नाव |
|---|---|---|
| १ | प्रकरण/पमपा/पापुवि/३५२५/ .क्र.१४/१०५६/२०२५ | पनवेल महानगरपालिका क्षेत्रातील ओवे तलावातून ओवे कॅम्प व ओवे गावांकरिता पाणी पुरवठा करणेबाबत. |

या बाजारभावाबाबतची माहिती वृत्तपत्रात प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरबाबतची दरपत्रके दि. २६/०९/२०२५ ते दि. ०३/१०/२०२५ रोजी दुपारी ०३.०० वाजे पर्यंत पाणी पुरवठा विभाग, पनवेल महानगरपालिका येथे सादर करण्यात यावी. सदर कामाबाबतची विस्तृत माहिती पनवेल महानगरपालिकेच्या पाणी परवठा विभागात प्राप्त होईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

**जा.क्र :-पमपा/जनसंपर्क./३१२५/प्र.क्र. ४८५/४९८/२०२५**
**दिनांक :- २५/०९/२०२५**

**सही/-**
**शहर अभियंता**
**पनवेल महानगरपालिका**

# नेरळ ज्येष्ठ नागरिक मंडळाचा वर्धापन दिन

**नेरळ : प्रतिनिधी**

नेरळ ज्येष्ठ नागरिक मंडळ नेरळ यांचा ३२वा वर्धापन दिन सोहळा नेरळ येथील आंबेमाता हॉल येथे मोठ्या उत्साहात झाला. या सोहळ्यास ज्येष्ठ मंडळींबरोबरच गावातील नागरिकांची मोठी उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान सावळाराम जाधव यांनी भूषवले.

प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित असलेले नेरळ पोलिस ठाण्याचे अधिकारी शिवाजी ढवळे यांनी ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेविषयी महत्त्वाचे मार्गदर्शन केले. तालुका आरोग्य अधिकारी डॉ. नितीन गुरव यांनी आपल्या मार्गदर्शनात ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्याबाबत उपयुक्त माहिती दिली.

सूत्रसंचालन दिलीप बोरसे यांनी केले. या सोहळ्यात ७५ वर्षे पूर्ण केलेल्या ज्येष्ठ नागरिकांचा विशेष सत्कार करण्यात आला. या वेळी नेरळ ग्रामसेवक अरुण कारले, माजी उपसरपंच मंगेश म्हसकर, अखिल भारतीय ज्येष्ठ नागरिक संघटनेचे रवी रामन यांचीही उपस्थिती होती.



# लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला सर्वोत्तम सीबीएसई स्कूल पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेचे कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूलला एज्युकेशन टुडेज महाराष्ट्र स्कूल रँकिंग्ज २०२५ मार्फत होलिस्टिक एज्युकेशन श्रेणीमध्ये महाराष्ट्राचा सर्वोत्तम सीबीएसई स्कूल पुरस्कार देवून सन्मानित करण्यात आले. पुरस्कार १२ सप्टेंबर २०२५ रोजी मुंबईत झालेल्या महाराष्ट्र एज्युकेटर्स समिट अँड अवॉर्ड्स २०२५ मध्ये कार्यक्रमामध्ये प्रदान करण्यात आला.





हा पुरस्कार स्कूलला मिळाल्याबाबत लोकनेते रामशेठ ठाकूर पब्लिक स्कूल, कामोठेचे प्रिन्सिपल अविनाश कुलकर्णी यांचे व स्कूलच्या सेवकांचे रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर व आमदार प्रशांत ठाकूर, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, 'रयत'चे जनरल बॉडी सदस्य वाय.टी. देशमुख यांनी अभिनंदन केले व शुभेच्छा दिल्या.

या वेळी कामोठे येथील लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मिडीयम स्कूल व ज्यूनि. कॉलेजच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे, उलवा विद्यालय चेअरमन शरद खारकर, 'रयत'चे रायगड विभागीय पीआरओ बाळासाहेब कारंडे, दिनेश सासवडे यांनीही अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या.

हा पुरस्कार नाविन्यपूर्ण शिक्षण आणि मूल्य आधारित शिक्षणाद्वारे भविष्यासाठी विद्यार्थी घडविण्याच्या आमच्या प्रयत्नाला बळकटी देईल. तसेच शैक्षणिक उत्कृष्ठता आणि सर्वांगीन विद्यार्थी विकासासाठी आमची सर्वांची सामुहिक वचनबद्धता प्रतिबिंबित करतो, असे प्राचार्य अविनाश कुलकर्णी यांनी अभिनंदनाच्या वेळी आश्वासित केले आहे.

# उरण-बेलापूर रेल्वेमार्गांवरील वाढीव २० फेऱ्या ऑक्टोबरपासून?

**उरण : प्रतिनिधी**

उरण-बेलापूर, नेरूळ या रेल्वेमार्गांवरील प्रवाशांच्या समस्या सोडविण्याचे आश्वासन केंद्रीय रेल्वे मंत्री आश्विनी वैष्णव यांनी मागील वर्षी विधानसभा निवडणुकीच्या प्रचार सभेत उरणच्या जनतेला दिले होते.या लोकल रेल्वेमार्गांवरील फेऱ्यामध्ये वाढ होणार असून,दररोज ४० ऐवजी ६० फेऱ्या होणार आहेत.

त्यामुळे दैनंदिन प्रवाशांना दिलासा मिळणार आहे, मात्र लोकल वाढी संदर्भात कोणताही प्रस्ताव तयार करण्यात आलेला नसल्याचे स्पष्टीकरण देण्यात आले आहे. लवकरच उरण – बेलापूर, नेरूळ रेल्वे लोकलच्या फेऱ्या वाढवणार असल्याचे



संकेत देण्यात आले आहेत. उरणचे आमदार महेश बालदी यांनी नुकतीच दिल्ली येथे केंद्रीय रेल्वेमंत्री आश्विनी वैष्णव यांची घेऊन उरण – बेलापूर, नेरूळ रेल्वे लोकलच्या फेऱ्यात वाढ करण्याची तसेच रेल्वे प्रवाशांच्या अन्य समस्या सोडविण्याची मागणी केली होती. या बैठकीत वैष्णव यांनी सकारात्मक भूमिका घेऊन येत्या या मार्गावरील १० फेऱ्या वाढविण्याचे आश्वासन दिले होते. याची लवकरच अंमलबजावणी होईल, अशी माहिती उरणचे आमदार महेश बालदी यांनी होती.

त्यासाठी बालदी यांनी मध्य रेल्वे विभागाकडे पाठपुरावा सुरु केला आहे. तर उरण – बेलापूर, नेरूळ या महत्वपूर्ण रेल्वेमार्गाच्या संदर्भात केंद्रातील संबंधित अधिकाऱ्यांशी सविस्तर चर्चा करण्यात आली. प्रवाशांच्या सोयीसाठी लवकरच सध्याच्या ४० फेऱ्यांऐवजी ६० फेऱ्या सुरू करण्यासंदर्भात महत्वपूर्ण निर्णय घेण्यात येणार आहे. यामुळे उरण व नेरूळ मार्गावरील रेल्वेप्रवाशांचा दैनंदिन प्रवास अधिक सुखकर व सोयीस्कर आणि वेळेवर होण्यास मदत होणार आहे.

# युईएस कॉलेजमध्ये आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षणाचा समारोप

**उरण : वार्ताहर**

युईएस कॉलेज ऑफ मॅनेजमेंट अँड टेक्नॉलॉजी येथे १७ ते २२ सप्टेंबर २०२५ दरम्यान आयोजित केलेल्या पाच दिवसीय आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचा यशस्वी समारोप समारंभपूर्वक झाला. हा कार्यक्रम महाराष्ट्र शासन–गृहनिर्माण विभाग (विशेष) तसेच सिव्हिल डिफेन्स फोर्स, उरण यांच्या सहकार्याने आयोजित करण्यात आला होता.

समारोप समारंभाला राहुल कटवाणी, डॉ. सत्या ठाकरे, मनोहर म्हात्रे, ज्योती म्हात्रे, हरेश्र्वर ठाकूर, युईएस संस्थेचे अध्यक्ष चंद्रकांत ठक्कर, सहसचिव अ‍ॅड. अपूर्वा ठाकूर, सिनिअर कॉलेजच्या प्रभारी प्राचार्या डॉ. मीनाक्षी गुप्ता, विभाग प्रमुख, प्राध्यापकवर्ग तसेच एन.एस.एस.चे सर्व स्वयंसेवक या कार्यक्रमाला उपस्थित होते.



# उरण मुळेखंड येथे स्वच्छता जनजागृती रॅली

**उरण : रामप्रहर वृत्त**

जन सामान्यांमध्ये प्रचार व प्रसाराच्या माध्यमातून विविध सरकारी योजना, स्वच्छता जनजागृती माहिती, आरोग्यविषयक जनजागृती, कौशल्य विकास उपक्रम आदींना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने जन शिक्षण संस्थान रायगडच्या माध्यमातून मंगळवारी मुळेखंड–उरण येथे स्वच्छता जनजागृती रॅली, स्वच्छता व कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले.



कार्यक्रमाला उपस्थित असणाऱ्या प्रशिक्षणार्थी यांना कार्यक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे यांच्या माध्यमातून स्वच्छतेची शपथही देण्यात आली.

'कौशल्य विकास व उद्योजकता मंत्रालय भारत सरकार' यांच्या विशेष पुढाकारातून संपूर्ण रायगड जिल्ह्यामध्ये व्यवसाय प्रशिक्षणाचे कार्य मागील २० वर्ष पासून सक्रियपणे सुरू आहे व आतापर्यंत ७० हजारांपेक्षा जास्त लाभार्थ्यांना व्यवसाय प्रशिक्षण देण्यात आले आहे.

याच स्वच्छता, आरोग्य व जनजागृती उपक्रमाचा एक भाग म्हणून मुळेखंड–उरण ह्या ठिकाणी स्वच्छता जनजागृती रॅली, स्वच्छता व कापडी पिशव्यांचे वाटप या उपक्रमाप्रसंगी सहाय्यक कार्यक्रम अधिकारी कल्पना म्हात्रे, प्रशिक्षिका सोनिया पाटील, ग्रामपंचायत सदस्या उज्वला म्हात्रे, अंगणवाडी सेविका वंदना पाटील, सविता म्हात्रे व प्रशिक्षणार्थी यांच्या उपस्थितीत कार्यक्रम उत्साहात पार पडला.



**उरण : गुरुकुल अकॅडमी आधार सावली फाउंडेशनच्या सार्वजनिक नवरात्रोत्सवातील विराजमान देवी.**

# प्राचार्य स्वप्नाली म्हात्रे यांना पुरस्कार

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

लोकनेते रामशेठ ठाकूर इंग्लिश मीडियम स्कूल आणि ज्युनिअर कॉलेज कामोठे या विद्यालयाच्या प्राचार्या स्वप्नाली म्हात्रे यांना 'लोकमत'तर्फे दिला जाणारा वुमन्स अचिव्हर अवॉर्ड एक्सलन्स इन एज्युकेशन लीडरशिप पुरस्कार प्रदान करण्यात आला. याबद्दल त्यांचे माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी अभिनंदन केले.



२४ सप्टेंबर रोजी हा गौरव समारंभ मुंबई येथे झाला. महाराष्ट्र विधानसभेचे अध्यक्ष माननीय राहुल नार्वेकर, महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे लोकमत समूहाचे चेअरमन डॉ. विजय दर्डा आदी उपस्थित होते.

रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिल मेंबर लोकनेते रामशेठ ठाकूर यांचा दृढ विश्वास व पाठबळ तसेच विद्यालयाचे चेअरमन आमदार प्रशांत ठाकूर यांचे सातत्यपूर्ण मार्गदर्शन याचे फलित म्हणजे त्यांना मिळालेला हा पुरस्कार होय. त्यांचे विशेष अभिनंदन विद्यालयाच्या पर्यवेक्षिका ससारिका लांजुडकर नेहा खन्ना तसेच मीनल नाईक आदींनी केले आहे.

# विद्यार्थ्यांची दिव्यांग शाळेला भेट

**उरण : रामप्रहर वृत्त**

कोकण ज्ञानपीठ उरण महाविद्यालय अजीवन निरंतर शिक्षण विभागातर्फे उरण येथील स्वामी ब्रह्मानंद प्रतिष्ठान सी बर्ड स्कूलला नुकतीच भेट देऊन दिव्यांग विशेष विद्यार्थ्यांशी महाविद्यालय विद्यार्थी यांनी संवाद साधला तसेच तेथील कार्यपद्धतीचा आढावा महाविद्यालय विद्यार्थ्यांनी घेतला. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वाल्मीक गर्जे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते.

प्रमुख पाहुण्या गौरी घरत यांनीही आपल्या या वेळी भावना व्यक्त केल्या. या वेळी पल्लवी परदेशी, स्मिता मॅडम यांनी शाळेतील कार्याचा आढावा घेतला. प्रा. व्ही. एस. इंदुलकर यांनी भेटीचा उद्देश व्यक्त केला.





**नवदुर्गा नवरात्रोत्सव मंडळ बोरी, उरण**





**दुर्गामाता दौड (माळ चौथी)**

पनवेल : श्री शिवप्रतिष्ठान हिंदुस्थानमार्फत पनवेलमध्ये तीन ठिकाणी दुर्गामाता दौड काढण्यात आली. पहिली दौडीची सुरुवात ही खांदा कॉलनी, जगदंब मित्र मंडळ सीकेटी कॉलेजच्या बाजूला बालभारतीच्या समोर सेक्टर १२ नवीन पनवेल इथून झाली. पुढे ही दौड सेक्टर ७,८,९,२,१ अशी मार्गक्रमण करीत सेक्टर १४मधील अभिषेक भोपी यांनी बसवलेल्या नवरात्रोत्सवात पोहचली, तिथे देवीचे श्लोक व आरती घेण्यात आली. नंतर मार्गक्रमण करून पुढे सेक्टर १०,११ आरती घेण्यात आली व दौडीची सांगता ही जगदंब मित्र मंडळ सेक्टर १२ इथे करण्यात आली. दुसरी दौड ही करंजाडे गाव आणि सेक्टर भागात काढण्यात आली तसेच तिसरी दौड ही पनवेलमधील डेरवली या गावात काढण्यात आली. या दौडमध्ये सहभागी होण्यासाठी शुभम साळुंखे (९७०२७०६२६२) यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

# सांस्कृतिक विभागाच्या अध्यक्षपदी चेतन पाटील

**उरण : प्रतिनिधी**

चाईल्ड केअर सामाजिक संस्था रायगड जिल्हा सांस्कृतिक विभागाच्या रायगडपदी उरण तालुक्यातील खोपटे गावचे चेतन पाटील यांची बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

कलाकारांच्या चळवळीला विशेष योगदान देणाऱ्या नाट्य, सिनेमा, टेलिव्हिजन युट्युबचे कलाकार चेतन पाटील यांनी नाट्य, गायन, नृत्य, निवेदन तसेच अन्य क्षेत्रात विशेष कामगिरी बजावली आहे. या त्यांच्या सांस्कृतिक गुणांचा सन्मान करून त्यांची चाईल्ड केअर सांस्कृतिक संस्था रायगडच्या सांस्कृतिक विभागाच्या रायगडपदी बिनविरोध निवड करण्यात आली आहे.

या त्यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून, अष्टगंध कला मंचाचे अध्यक्ष अशोक म्हात्रे, सचिव दत्तात्रेय घरत, नाटककार हसूराम पाटील आदींनी त्यांचे अभिनंदन केले.

## नवरंग — रंग पिवळा



गव्हाण–कोपर हायस्कूल



मोरू नारायण म्हात्रे विद्यालय व तुकाराम नारायण घरत ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स, उलवे नोड



खालापूर नगरपंचायत कर्मचारी



स्नेहश्री सीकेपी महिला मंडळ, पनवेल




पनवेल महानगरपालिका अधिकारी व कर्मचारीवृंद.



हरी मधूर मिलन सोसायटी, से. ५, नवीन पनवेल

# माणगावात विनापरवाना गायींची वाहतूक

## पोलिसांची कारवाई; पाच टेम्पो जप्त



**माणगाव : बातमीदार**

दत्तनगर येथे बुधवार दि.२४ सप्टेंबर रोजी रात्री सुमारे ९ वाजता पत्रकार प्रमोद जाधव गेले असता त्यांना गीर गायींची वाहतूक करणारे पाच छोटे टेम्पो संशयास्पदरीत्या उभे असल्याचे दिसून आले. त्यांनी तत्काळ माणगाव पोलिसांना याबाबत माहिती दिली. त्यानंतर कारवाई करण्यात आली.

चौकशीत उघड झाले की ज्या गोशाळेत या गायी नेण्यात येत असल्याचे सांगितले जात होते, ती मंडणगड तालुक्यात अस्तित्वातच नाही. त्यामुळे ही अवैध तस्करी असल्याचा संशय खरा ठरला. तहानलेल्या व भुकेलेल्या व्याकूळ गायी पाहून पोलिसांनी त्यांना सामाजिक कार्यकर्ते सुरेश जैन व राजेंद्र जैन यांच्या सहकार्याने जवळील गोशाळेत हलविले. या वेळी भाजप युवा मोर्चाचे जिल्हा अध्यक्ष निलेश थोरे, त्यांचे सहकारी, अॅड. अनिकेत ठाकूर तसेच पत्रकार प्रतिक मोरे हेदेखील उपस्थित होते.

पाच छोट्या टेम्पोतून प्रत्येकी चार अशा एकूण २० गीर गायींची विनापरवाना वाहतूक होत असल्याचे पोलीस तपासात समोर आले. पोलिसांनी वाहने ताब्यात घेत गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी शेखर कासारे आणि पाच टेम्पोचालकांविरोधात विनापरवाना वाहतुकीचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या गायी पेरियार गोशाळा फाउंडेशन, पो. वासुंदे (ता. सुधागड, जि. रायगड) व पो. लाटवन (ता. मंडणगड, जि. रायगड) येथील गोशाळेत नेण्यात येत असल्याचा बनाव करण्यात आला होता, असेही समोर आले. या संपूर्ण कारवाईचा तपास माणगाव पोलीस ठाण्याचे निरीक्षक निवृत्ती बोऱ्हाडे यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू आहे.

# बेकायदेशीरपणे अग्निशस्त्र बाळगणाऱ्या आरोपींवर गुन्हा

**माणगाव : प्रतिनिधी**

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने बेकायदेशीर अग्नीशस्त्र ताब्यात बाळगल्याप्रकरणी दोघा आरोपींना ताब्यात घेऊन त्यांच्यावर महाड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस शिपाई लालासाहेब वाघमोडे यांना मिळालेल्या गोपनीय बातमीनुसार कृणाल रामचंद्र सर्कले (रा.सांदोशी, ता.महाड) हा आमडोशी फाटा येथे सकाळी १० ते ११ वाजण्याच्या दरम्यान त्याच्याकडे असणारे अग्निशस्त्र विक्री करण्याकरिता येणार आहे. ही माहिती वाघमोडे यांनी स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांना दिली.

यानंतर रायगड जिल्हा पोलीस अधीक्षक आंचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक रायगड अभिजित शिवथरे, पोलीस निरीक्षक मिलिंद खोपडे यांच्या मार्गदर्शनानुसार व सूचनेप्रमाणे स्थानिक गुन्हा अन्वेषण शाखेचे पोलीस उपनिरीक्षक अविनाश पाटील, हवालदार सुदीप पहेलकर, शिपाई मोरेश्वर ओमले, वाघमोडे, बाबासाहेब पिंगळे, ओंकार सोंडकर यांच्या पथकाने छापा टाकून कारवाई केली.

या वेळी एक इसम हा आमडोशी फाटा येथे त्याच्या हातात काहीतरी गुंडाळलेल्या स्थितीत घेऊन चालत येताना दिसला. पोलीस पथकाने या इसमाला ताब्यात घेतले. त्याची पंचांच्या समक्ष अंगझडती घेतली असता अग्निशस्त्र व एक जिवंत काडतूस मिळून आले. त्यावेळी या इसमाकडे अग्निशस्त्र बाळगण्याचा परवाना आहे का याबाबत त्याला विचारले असता त्याने परवाना नसल्याचे सांगून हे अग्निशस्त्र कोथुर्डे सोनारवाडी (ता.महाड) येथील लक्ष्मण सीताराम पवार उर्फ बाबू (वय ४०) यांचे असल्याचे सांगितले.

यावरून दोघांनीही अवैधरित्या व बेकायदेशीरपणे कोणताही परवाना नसताना अग्निशस्त्र विक्री करण्याच्या उद्देशाने ताब्यात बाळगल्याने त्यांच्याविरुद्ध महाड तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

देशी बनावटीचे २५ हजार रुपये किमतीचे अग्निशस्त्र व एक जिवंत काडतूस ज्याची किंमत ५०० रुपये आहे असा एकूण २५ हजार ५०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून अधिक तपास पोलीस करीत आहेत.



# माजी सरपंच संजय देशमुख शिवसेनेत

**महाड : प्रतिनिधी**



नडगाव ग्रामपंचायतीमध्ये अपक्ष म्हणून सरपंच पदावर निवडून आलेले आणि सरपंच झाल्यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये प्रवेश केलेले सरपंच संजय देशमुख यांनी शिवसेनेत जाहीर पक्षप्रवेश केला.

या वेळी मंत्री भरत गोगावले आणि शिवसेनेचे कोअर कमिटी सदस्य तथा कोकण सचिव विकास गोगावले प्रमुख उपस्थिती होती.

माजी सरपंच देशमुख यांच्यासोबत सोमनाथ सखाराम महाडिक, गजानन दिनकर महाडिक, नथुराम मारुती महाडिक, अभय बळीराम देशमुख, गणित संजय देशमुख, राजेश सुमित देशमुख, बिपिन सखाराम खोपडे, साहिल जितेंद्र पाटेकर, जगदीश मोरे, पुष्कर गबाळे, हर्षद महाडिक, कृणाल टमके, मुकेश मनोहर महाडिक, अशोक अरुण महाडिक , शांताराम बाबुराव खोपडे, रोहिदास टमके, महादेव रामचंद्र महाडिक, सुभाष कृष्णा महाडिक, सुनील परशुराम महाडिक, नागेश भागोजी महाडिक, गणपत शांताराम महाडिक, मनोहर शांताराम महाडिक, संतोष रघुनाथ महाडिक, संदीप गणपत महाडिक, दिनेश सकपाळ, संतोष कृष्णा महाडिक, राजेंद्र भिवा पवार, ज्ञानेश्वर कवितके, सुरेश चंद्रकांत कोळी आदींनी शिवसेनेचा झेंडा हाती घेतला.

## 'नीट' परीक्षेत मुद्रा जाधव यश

**श्रीवर्धन : प्रतिनिधी**

श्रीवर्धन तालुक्यातील कोंढे येथील मुद्रा मिलिंद जाधव ही कठीण अशा नीट परीक्षा उच्च श्रेणीत उत्तीर्ण झाली आहे. यासह तिने संपूर्ण रायगड जिल्ह्याचा मान उंचावला आहे.



मुद्राने गेल्या दोन वर्षांपासून अथक परिश्रम, चिकाटी आणि नियोजनबद्ध अभ्यास करून हे यश संपादन केले. प्राध्यापक तसेच आई मुग्धा मिलिंद जाधव यांचे मार्गदर्शन आणि पाठबळ या यशामागील महत्त्वाचा पाया ठरले. तिला केईएम हॉस्पिटल मेडिकल कॉलेज, मुंबई येथे एमबीबीएस. प्रवेश मिळाला आहे. डॉक्टर होण्याचे तिचे स्वप्न आहे.

# कल्पना तळेकर यांना आदर्श शिक्षक पुरस्कार

**रोहा : प्रतिनिधी**



माधवबाग हॉस्पिटल खोपोलीच्या वतीने आणि महाराष्ट्र राज्य शिवछत्रपती शिक्षक संघटना रायगडच्या सहकार्याने जिल्हास्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार रोहा भुवनेश्वर येथील कल्पना योगेश तळेकर यांना खोपोली येथे आयोजित कार्यक्रमात कोकण विभाग शिक्षक मतदार संघाचे आमदार ज्ञानेश्वर म्हात्रे यांच्या हस्ते देण्यात आले.


या कार्यक्रमास माधवबाग हॉस्पिटल डमिनिस्ट्रेटर डॉ. राहुल जाधव, डॉ. ज्ञानेश्वर मगर (उपकुल सचिव, सोमय्या विद्यापीठ, मुंबई) व डॉ. गुरुदत्त अमीन (चीफ मेडिकल ऑफिसर, माधवबाग) यांच्यासह माधवबाग हॉस्पिटलमधील डॉक्टर, शिक्षक संघटनेचे पदाधिकारी व इतर मान्यवर उपस्थित होते.

कल्पना तळेकर या कोएसोच्या स.रा तेंडुलकर व वि.म पिळणकर कनिष्ठ महाविद्यालय रेवदंडा येथे कार्यरत आहेत. पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे मुख्याध्यापक, शिक्षक, रोहा व भुवनेश्वर येथील मान्यवरांनी अभिनंदन केले.

## सूर्यजित चौधरीला लंडनची पदवी प्रदान

**माथेरान : प्रतिनिधी**

भारतीय जनता पक्षाचे माथेरान शहर उपाध्यक्ष किरण चौधरी यांचा पुत्र सूर्यजित याने लंडनमध्ये मास्टर ऑफ सायन्स ईन इंटरनॅशनल हॉस्पॅलिटी मॅनेजमेंट ही पदवी प्राप्त केली आहे. मोठ्या थाटामाटात या पदवी प्रदान सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.



सोशल मीडियावर कार्यक्रमाचे फोटो झळकताच माथेरानच्या सर्व स्तरातून सूर्यजितवर कौतुकाचा वर्षाव केला गेला. आपल्या मुलाचा हा कौतुक सोहळा पाहण्यासाठी त्याचे आई, वडील व बहीण हेदेखील त्या ठिकाणी उपस्थित होते.

# शिलाई मशीन, ब्युटीपार्लर प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील रोहिदासवाडी, गोरेगाव येथे चारिझेन फाऊंडेशनच्या वतीने शिलाई मशीन व ब्युटीपार्लर प्रशिक्षण प्रमाणपत्र वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमास फाऊंडेशनचे अध्यक्ष कॅ. निर्मलसिंग रंधावा, कोऑर्डिनेटर सचिन वाघ व किशोर झेमसे यांच्यासह रोहिदासवाडी अंगणवाडी सेविका अर्चना गोरेगावकर व मदतनीस कोमल गोरेगावकर उपस्थित होते.

महिलांना शिलाईचे प्रशिक्षण सुजाता इंगळे, तर ब्युटीपार्लरचे प्रशिक्षण अनिता चौधरी यांनी दिले. या वेळी शिलाई वर्गातील १३ महिलांना आणि ब्युटीपार्लर वर्गातील सात महिलांना बेसिक व अॅडव्हान्स प्रशिक्षणाची प्रमाणपत्रे देण्यात आली.

विशेष म्हणजे, मागील तीन वर्षांत चारिझेन फाऊंडेशनमार्फत ३००हून अधिक महिलांना विविध कौशल्यांमध्ये प्रशिक्षण देण्यात आले असून फाऊंडेशनच्या या सामाजिक उपक्रमामुळे अनेक महिला स्वावलंबी होण्याच्या मार्गावर आहेत.



# अग्रसेन महाराज जयंती साजरी

**नागोठणे : बातमीदार**

नागोठणे येथील स्थानिक अग्रवाल समाजाच्या वतीने अग्रसेन महाराज जयंती नागोठणे ग्रामपंचायतीच्या श्री गणेश सभागृहात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. या निमित्ताने समाजातील सर्व महिला, पुरुष व लहान मुले एकत्र जमून आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

कार्यक्रमाची सुरुवात संस्थापक महाराजा अग्रसेन यांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. महाराजा अग्रसेन हे प्राचीन काळातील समाजसुधारक, उद्योजकता व सहकाराची शिकवण देणारे महान राजे होते. जयंतीनिमित्त विविध मनोरंजनाचे कार्यक्रम, सांस्कृतिक सादरीकरणे व खेळ यांचे आयोजन करण्यात आले. महिला व तरुणांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला. कार्यक्रमात सर्वांनी एकत्र येऊन अग्रसेन महाराजांना वंदन केले व ऐक्य व बंधूता याचा संदेश दिला.

कार्यक्रमाच्या शेवटी सर्व उपस्थितांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. या कार्यक्रमामुळे समाजातील एकोपा अधिक दृढ झाल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले.

कार्यक्रमाच्या युवा अध्यक्ष पराग मोदी, राधेश्याम अग्रवाल, बांधकाम व्यावसायिक संजूशेठ मोदी, भाजप शहराध्यक्ष सचिन मोदी, प्रसिद्ध व्यापारी दौलतशेठ मोदी, गुड्डूशेठ मोदी, अमित मोदी, विशाल मोदी, नारायण मोदी, बाबुलाल मोदी, संदीप अग्रवाल, जितेश मोदी, डॉ. अमिता अग्रवाल आदी समाज बांधवांसह विविध स्तरातील मान्यवर उपस्थित होते.




## पन्हळघरचे ग्रामदैवत श्री काळभैरव महाराज

**माणगाव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील पन्हळघर बुद्रुक या गावाचे आराध्य दैवत श्री काळभैरव महाराजांचा पारंपरिक नवरात्रोत्सव विधीवत देवघटी बसवून उत्साहात सुरू आहे.



ब्रिटीश काळापासून आजवर चालत आलेली ही प्रथा आणि परंपरा पन्हळघरवासीयांसाठी अनन्यसाधारण आहे. या देवस्थानात श्री काळभैरव महाराजांसोबत जोगेश्वरी, सोमजाई आणि काळीकामाता अशी ग्रामदैवते विराजमान आहेत.

लोणेरेपासून हाकेच्या अंतरावर पन्हाळ्याच्या पायथ्याशी वसलेल्या या गावात सध्या काळभैरव महाराजांचे नव्या भव्य मंदिराचे बांधकाम सुरू असून ग्रामस्थांच्या अथक परिश्रमातून मंदिराची उभारणी होत आहे. शिवकालीन वास्तू असलेल्या या मंदिराला ग्रामस्थांच्या हाकेला धावणारे देवस्थान म्हणून विशेष मान आहे. देवस्थानचे पुजारी व मानकरी यांनी काळभैरव महाराजांच्या चरणी गार्हाणे मांडत गावाला आणि लेकरांना संकटांपासून वाचव अशी प्रार्थना केली. महाआरतीवेळी अक्षतांची उधळण करत ग्रामस्थांनी भैरवनाथ महाराज की जय असा जयघोष केला.

या उत्सवाला सुरुवात होताच ग्रामस्थांमध्ये आनंद आणि उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. नऊ दिवस विविध धार्मिक विधी, पूजा-अर्चा आणि सांस्कृतिक कार्यक्रमांनी हा उत्सव साजरा करण्यात येत आहे. हा नवरात्रोत्सव म्हणजे एकोपा, भक्ती आणि परंपरेचा आनंद उत्सव असल्याचे ग्रामस्थांनी सांगितले.

# गोंधळपाडा येथे रक्तदान शिबिर

**अलिबाग : प्रतिनिधी**

अलिबाग तालुक्यातील गोंधळपाडा येथील समाजमंदिरात रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी मंडळाच्या सदस्यांसह परिसरातील तरुणांनी रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

गोंधळपाडा येथील जयभवानी मित्र मंडळातर्फे सार्वजनिक नवरात्र उत्सव साजरा करण्यात येत आहे. नवरात्रोत्सवानिमित्त धार्मिक व सांस्कृतिक कार्यक्रमांसह सामाजिक उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मंगळवारी सकाळी १० ते दुपारी २ या वेळात रक्तदान शिबिर घेण्यात आले. या शिबिराला तरुणांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. शिबिरात सुमारे पंचवीसहून अधिक तरुणांनी रक्तदान केले.

रायगड जिल्हा सामान्य रुग्णालयाच्या रक्तपेढीचे जिल्हा रक्त संक्रमण अधिकारी डॉ. दीपक गोसावी, सामाजिक कार्यकर्ते अधीक्षक नवनाथ अळ्ळी, अधिपरिचारक रामकुमार निकस, वैभव कांबळे, गणेश भोये, चालक महेश घाडगे, मंगेश पिंगळा यांच्या पथकाने रक्त संकलन केले. रक्तदात्यांना जिल्हा रक्तपेढीतर्फे प्रमाणपत्र देण्यात आले. तर जयभवानी मंडळातर्फे रक्तदात्यांना नाश्ताची व्यवस्था करण्यात आली होती. मंडळाचे अध्यक्ष मनोज पडियार यांच्या मार्गदर्शनाखाली सदस्य सुमित चव्हाण, महेश पडियार व त्यांच्या सहकाऱ्यांनी हे रक्तदान शिबिर यशस्वी करण्यासाठी मेहनत घेतली.



# भारत आशिया कपच्या फायनलमध्ये

## बांगलादेश संघावर मात

**दुबई : वृत्तसंस्था**

फलंदाजी व गोलंदाजी या दोन्ही आघाड्यांवर उत्तम वर्चस्व गाजवणाऱ्या भारताने आशिया चषक टी-२० स्पर्धेतील दुसऱ्या सुपर ४ लढतीत बांगलादेशचा ४१ धावांनी धुव्वा उडवला आणि यासह स्पर्धेच्या अंतिम फेरीत जोरदार धडक मारली. प्रारंभी बांगलादेशने भारताला बिनबाद ७७ वरून ६ बाद १६८ धावांवर रोखून धरण्यात मोठे यश मिळवले, मात्र ही धावसंख्याही त्यांच्यासाठी आवाक्याबाहेरील ठरली. त्यांना १९.३ षटकात सर्वबाद १२७ धावांवरच गाशा गुंडाळावा लागला.

भारतीय संघातर्फे कुलदीप यादवने १८ धावात तीन, तर बुमराह व चक्रवर्ती यांनी प्रत्येकी दोन विकेट्स घेतल्या. अक्षर व तिलक यांनाही प्रत्येकी एक बळी मिळाला. तिलकने रहमानला पटेलकरवी झेलबाद केले आणि येथेच भारताच्या धडाकेबाज विजयावर शिक्कामोर्तब झाले.



विजयासाठी १६९ धावांचे आव्हान असताना बांगलादेशची सुरुवात खराब झाली. दुसरा सलामीवीर तंजिद हसन बुमराहच्या गोलंदाजीवर दुबेकडे झेल देत अवघ्या एका धावेवर तंबूत परतला, तर परवेझ होसेनला २१ धावांवर कुलदीप यादवने बाद केले. कुलदीपच्या चेंडूवर उत्तुंग फटका मारण्याच्या प्रयत्नात परवेझने डीप मिडविकेटवरील अभिषेककडे सोपा झेल दिला. कुलदीपने या लढतीतदेखील संघाला ब्रेकथ्रू मिळवून देण्याची परंपरा कायम राखली.

सैफ हसनने सातत्याने धावफलक हलता ठेवत दडपण दूर करण्यावर भर दिला, मात्र तौहिद हृदोय केवळ ७ धावांवर बाद झाल्याने बांगलादेशला आणखी एक धक्का बसला. तौहिद बाद झाला, त्यावेळी बांगलादेशची ९.४ षटकात ३ बाद ६५ अशी स्थिती होती. नंतर वरुण चक्रवर्तीने शमिम होसेनला बाद करत आणखी एक धक्का दिला. जाकर अली, सैफुद्दीन व रिषाद हे देखील लागोपाठ अंतराने बाद झाले आणि यामुळे पाहता पाहता बांगलादेशची ७ बाद ११२ अशी पडझड झाली. सकिब आठव्या गड्याच्या रुपाने बाद झाल्यानंतर एक बाजून लावून धरत ६९ धावा झोडपणारा सैफ हसन १८व्या षटकात बुमराहचे सावज ठरला.

तत्पूर्वी अभिषेक शर्मा आणि शुभमन गिल यांनी पहिल्या विकेटसाठी ७७ धावांची भागीदारी करत संघाला चांगली सुरुवात करून दिली. त्यानंतर भारताच्या फलंदाजी संघाला चांगली कामगिरी करता आली नाही. अभिषेक ३७ चेंडूत ७५ धावांवर बाद झाला आणि गिल २९ धावा करून पॅव्हेलियनमध्ये परतला. दरम्यान, हार्दिक पांड्याने २९ चेंडूत ३८ धावा केल्या. बांगलादेशकडून रिशाद हुसेनने दोन बळी घेतले, तर तन्झीह हसन सकीब, मुस्तफिजुर रहमान आणि मोहम्मद सैफुद्दीन यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला.

## अलिबाग येथे राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धा

**रायगड : रामप्रहर वृत्त**

राज्य क्रीडा व युवक सेवा संचालनालय, रायगड जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय आणि जिल्हा क्रीडा परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने अलिबाग येथे राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. ही स्पर्धा १५ वर्षांखालील मुला-मुलींसाठी आहे.

या स्पर्धेचे उद्घाटन २६ सप्टेंबर रोजी सकाळी १० वा. जिल्हा क्रीडा संकुल, नेहुली, अलिबाग येथे होणार आहे. या कार्यक्रमासाठी प्रमुख अतिथी म्हणून महिला व बालविकासमंत्री आदिती तटकरे, रोजगार हमी योजनामंत्री भरत गोगावले तसेच इतर अनेक मान्यवर उपस्थित राहणार आहेत. या वेळी विविध राजकीय नेते, आमदार, खासदार आणि क्रीडा अधिकारी यांचीदेखील उपस्थिती असणार आहे.

# विंडीज दौऱ्यासाठी टीम इंडियाची घोषणा

## गिलकडेच नेतृत्व; जडेजा उपकर्णधारपदी

**नवी दिल्ली : वृत्तसंस्था**

वेस्ट इंडिजविरुद्ध पुढील महिन्यात होणाऱ्या दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेसाठी गुरुवारी (दि. २५) भारतीय संघाची घोषणा करण्यात आली. भारतीय संघाचे नेतृत्त्व शुभमन गिल करणार असून रवींद्र जडेजाकडे उपकर्णधारपदी धुरा सोपविण्यात आली आहे. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील दोन कसोटी सामन्यांच्या मालिकेतील पहिला सामना २ ऑक्टोबर रोजी अहमदाबादमधील नरेंद्र मोदी स्टेडियमवर खेळवला जाणार आहे.

टीम इंडियाचा अनुभवी यष्टीरक्षक ऋषभ पंत अजूनही दुखापतीतून पूर्णपणे सावरलेला नाही. त्यामुळे वेस्ट इंडिजविरुद्ध ध्रुव जुरेल यष्टीरक्षणाची जबाबदारी सांभाळेल. इंग्लंड दौऱ्यावेळी पंतकडे उपकर्णधारपदाचीही जबाबदारी सोपविण्यात आली होती, मात्र या मालिकेत तो जखमी झाला. आता ही जबाबदारी रवींद्र जडेजाला देण्यात आली आहे.

आशिया चषकात भारतीय वेगवान गोलंदाजीचे नेतृत्व करणाऱ्या जसप्रीत बुमराहला वेस्ट इंडिजविरुद्ध विश्रांती देण्यात आलेली नाही. त्याच्यासोबत मोहम्मद सिराज आणि प्रसिद्ध कृष्णा यांच्यावर वेगवान गोलंदाजीची धुरा असेल. एन जगदीशनला राखीव खेळाडू म्हणून संघात स्थान देण्यात आले आहे.




### करुण बाहेर, सरफराजलाही संघात तूर्त संधी नाही!

इंग्लंड दौऱ्यातून आठ वर्षांनंतर



भारतीय संघात परतलेल्या करुण नायरला वेस्ट इंडिजविरुद्धच्या संघात स्थान मिळाले नाही. इंग्लंडविरुद्धच्या पाच कसोटी सामन्यांच्या मालिकेत त्याची कामगिरी अपेक्षेनुसार झाली नाही. दुसरीकडे सरफराज खानला पुन्हा एकदा कसोटी संघातून वगळण्यात आले आहे. सरफराजने गेल्या काही काळापासून देशांतर्गत क्रिकेटमध्ये भरपूर धावा केल्या होत्या, पण निवड समितीने त्याला या मालिकेसाठी निवडले नाही.

# कळंबोली येथील कुस्ती स्पर्धेत चुरशीच्या लढती; मुला-मुलींनी दाखवले कसब

**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिका जिल्हास्तरीय शालेय कुस्ती स्पर्धा पोलीस मुख्यालय कळंबोली, रोडपाली येथील सुसज्ज अशा कुस्ती प्रशिक्षण केंद्रात मॅटवर रंगली. स्पर्धेत नमुंमपा कार्यक्षेत्रातील विविध शाळा, कनिष्ठ महाविद्यालयातून १४, १७ व १९ वर्षाआतील १०५ मुले व ४९ मुली असे एकूण १५४ खेळाडू सहभागी झाले होते.



फ्री स्टाईल प्रकारात १४ वर्षाआतील मुलांच्या ३५ किलोखालील वजनी गटात प्रथम क्रमांक रणवीर संतोष जाधव, ३८ किलो गटात संजय बबन शिंदे, ४१ किलो गटात ओमकार अनिल पाटोळे, ४४ किलो प्रशांत निलेश पाईकराव, ४८ किलो गटात वेदांत विलास साळवी, ५२ किलो गटात तस्मय थोरात, ५७ किलो गटात जोतीराम शंकर पाटील, ६२ किलो गटात रोनक राजकुमार विश्वकर्मा, ६८ किलो गटात आयुष ज्ञानदेव गोसावी यांनी पटकाविला.

१४ वर्षाआतील मुलींच्या ३३ किलोखालील वजनी गटात प्रथम क्रमांक ओमी प्रदीप गायकवाड, ३६ किलो गटात संशिखा महावीर शर्मा, ३९ किलो गटात उर्वी उमेश माने, ४२ किलो गटात शबाना शबीर शेख, ४६ किलो गटात तिथी थोरात, ५० किलो गटात सरस्वती राजू चिन्नीराठोड, ५४ किलो गटात पूर्वा विजय पवार, ६२ किलो गटात स्मरणिका राहुल बनसोडे यांनी संपादन केला.

१७ वर्षाखालील मुलांच्या ४५ किलोखालील वजनी गटात कुंदन जयवंत भोईर, ४८ किलो गटात सक्षम राकेश गायकवाड, ५१ किलो गटात आदर्श शंकर पाटील, ५५ किलो गटात विश्वजीत नवनाथ गायकवाड, ६० किलो गटात सिद्धांत महादेव जाधव, ६५ किलो गटात मकरंद विकास पाटील, ७१ किलो गटात यश चांगदेव जाधव, ८० किलो गटात प्रसाद सुरेश खैरे, ९२ किलो गटात प्रशांत दत्तात्रय पांढरे, ११० किलो गटात ओमकार दत्ता गायकवाड यांनी मिळविला.

१७ वर्षाआतील मुलींच्या ४३ किलोखालील वजनी गटात प्रथम क्रमांक सीमा विजयकुमार राठोड, ४६ किलो गटात वैष्णवी शंकर पाटील, ४९ किलो गटात तन्वी विभुते, ५३ किलो गटात करुणा राजेंद्र भणगे, ६१ किलो गटात कामिनी किशोर पाटील यांनी पटकाविला.

१९ वर्षाआतील मुलांच्या ५७ किलोखालील वजनी गटात प्रथम क्रमांक प्रेम सागर गायकवाड, ७९ किलो गटात शुभम शंकर नरळे यांनी संपादन केला. मुलींच्या ५९ किलो गटात प्रथम क्रमांक संस्कृती झायगुडे हिने मिळविला.

ग्रीको रोमन स्टाईल १७ वर्षाआतील मुलांच्या ५१ किलोखालील वजनी गटात प्रथम क्रमांक सार्थक धनावडे, ६० किलो गटात सागर नरळे, ६५ किलो गटात श्लोक पाटील यांनी, तर १९ वर्षाखालील मुलांच्या ७९ किलो गटात अथर्व तानाजी जाधव प्रथम क्रमांकाचा मानकरी ठरला.





पनवेल : २४व्या राज्यस्तरीय व रायगड जिल्हास्तरीय दिवाळी अंक स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा गुरुवारी झाला. त्या वेळी उपस्थित मान्यवर.

## नवरंग रंग पिवळा



सीकेटी विद्यालय इंग्लिश मीडियम प्राथमिक विभाग, नवीन पनवेल



तु.ह. वाजेकर विद्यालय फुंडे, उरण



मराठी प्राथमिक विद्यालय, कळंबोली



रामशेठ ठाकूर महाविद्यालय, खारघर



सावित्री महिला मंडळ, से. २ नेरूळ



मिलेनियम टॉवर बी टाईप सोसायटी, सानपाडा, नवी मुंबई

# नमुंमपा जिल्हास्तरीय शालेय बॅडमिंटन स्पर्धा उत्साहात



**नवी मुंबई : बातमीदार**

नवी मुंबई महापालिकेतर्फे आयोजित करण्यात आलेली जिल्हास्तरीय बॅडमिंटन स्पर्धा वाशी नवी मुंबई स्पोर्ट्स असोसिएशन येथे आंतरराष्ट्रीय दर्जाच्या बॅडमिंटन सुविधा स्पोर्ट्स असोसिएशनचे अध्यक्ष गणेश नाईक, उपाध्यक्ष विजय एस.पाटील, सचिव विजय आर. पाटील यांच्या माध्यमातून निःशुल्क उपलब्ध करून दिल्याने यशस्वी झाली. या स्पर्धेत विविध शाळा व कनिष्ठ महाविद्यालयांतून १४, १७ आणि १९ वर्षाआतील मुलांच्या गटात १३० संघ आणि मुलींच्या गटात ११९ संघ असे एकूण २४९ संघ सहभागी झाले होते.

मुलांच्या १४ वर्षाखालील गटात अंतिम सामना युरो स्कूल ऐरोली आणि दिल्ली पब्लिक स्कूल नेरूळ यांच्यात होऊन ऐरोली संघाने २-१ अशा सेटने विजय मिळवून अजिंक्यपद पटकाविले. हा संघ पुढील विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. या गटातील तिसरा क्रमांक पोद्दार इंटरनॅशनल स्कूल नेरूळने फादर ॲग्नल स्कूल वाशीवर विजय साकारत मिळवला. मुलींच्या गटात युरो स्कूल ऐरोलीने ॲव्हलॉन हाईट्स इंटरनॅशनल स्कूल वाशीवर २-० अशा सरळ सेटने मात करून अजिंक्यपद पटकाविले. हा संघ पुढील विभागीय स्पर्धेसाठी पात्र ठरला आहे. या गटातील तिसरा क्रमांक डीएव्ही पब्लिक स्कूल नेरूळने प्राप्त केला. त्यांनी एपीजे स्कूल नेरूळ संघाला पराभूत केले.

१७ वर्षांखालील मुलांच्या गटात डीएव्ही पब्लिक स्कूल ऐरोलीने दिल्ली पब्लिक स्कूल नेरूळला २-० अशा सेटने नमवत विजेतेपद पटकाविले आणि विभागीय स्पर्धेसाठी पात्रता निश्चित केली. तिसरा क्रमांक सेंट झेवियर्स हायस्कूल ऐरोलीने प्राप्त केला, ज्यांनी ॲव्हलॉन हाईट्स इंटरनॅशनल स्कूल वाशीला हरवले. मुलींच्या गटात फादर ॲग्नल स्कूल वाशीने सेंट मेरीज स्कूल वाशीवर २-०ने नमवून अजिंक्यपद पटकाविले व विभागीय स्पर्धेसाठी पात्रता संपादन केली. तिसरा क्रमांक युरो स्कूल ऐरोलीने न्यू होरायझन स्कॉलर स्कूल ऐरोलीवर मात करून मिळविला.

१९ वर्षांखालील मुलांच्या गटात दिल्ली पब्लिक स्कूल नेरूळने एपीजे स्कूल नेरूळवर २-० अशा सरळ सेटने अजिंक्यपद पटकावून मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्रता निश्चित केली. तिसरा क्रमांक डॉन बॉस्को सिनियर सेकंडरी स्कूल नेरुळने एसआयईएस ज्युनिअर कॉलेज नेरुळवर मात देऊन मिळवला. मुलींच्या गटात दिल्ली पब्लिक स्कूल नेरूळने डीएव्ही पब्लिक स्कूल नेरूळवर २-१ अशा सेटने सामना जिंकत अजिंक्यपद पटकावले आणि मुंबई विभागीय स्पर्धेसाठी पात्रता निश्चित केली. तिसरा क्रमांक एपीजे स्कूल नेरूळने नॉर्थ पॉइंट स्कूल कोपरखैरणेवर विजय साकारून मिळवला. सर्व विजेत्या संघांचे अभिनंदन होत आहे.

दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **-मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया अ‍ॅण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मटाले.** पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com